दैनिक
# जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०३ रे | अंक १०६ वा | रविवार, दि. ०७ जून २०२६ | RNI No. MAHMAR/2022/85155 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

## मराठा-कुणबी मंत्रालयाला मान्यता!

**जालना :** मराठा समाजाला आरक्षण, शैक्षणिक सुविधा आणि रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. मराठा आंदोलनाचे प्रमुख नेते मनोज जरांगे यांनी मराठा-कुणबी समाजासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्याच्या मागणीबाबत मोठा दावा केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा-कुणबी मंत्रालयाच्या स्थापनेस तत्त्वतः मान्यता दिली असल्याचे जरांगे यांनी सांगितले. मनोज जरांगे यांनी अंतरवाली सराटी येथे त्यांनी केलेल्या उपोषणानंतर राज्य सरकारने अनेक मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेतली. नुकत्याच काढण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार मराठा समाजाला ओबीसी समाजाप्रमाणे विविध लाभ देण्याचा मार्ग खुला झाला आहे.

**आजचे हवामान**
कमाल 36°C | किमान 24°C

पेट्रोल 111.21 | डिझेल 97.83

सोने 1,55,600 | चांदी 2,48,201

# रायगडावर शिवसंस्कृतीचा जागर

## छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५२ वा शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात; देशभरातून लाखो शिवप्रेमींची हजेरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे :** रायगडावर काल छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५२ व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याचा उत्साहपूर्ण जल्लोष पाहायला मिळाला. देशाच्या कानाकोपऱ्यातून हजारो शिवप्रेमी आणि शिवभक्त रायगडावर दाखल झाल्याने संपूर्ण परिसर शिवमय झाला होता. महाराजांच्या जयघोषाने गड दुमदुमून गेला असून विविध सांस्कृतिक आणि ऐतिहासिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ६ जून १६७४ रोजी याच रायगडावर पार पडला होता. या ऐतिहासिक दिवसाची आठवण जपण्यासाठी दरवर्षी संभाजीराजे छत्रपती रायगडावर उपस्थित राहून





शिवभक्तांना संबोधित करतात. यंदाही त्यांनी उपस्थितांना भावनिक शब्दांत संदेश दिला. संभाजीराजे छत्रपती यांनी उपस्थितांच्या उत्साहाचे कौतुक केले. रायगडावर जमलेल्या जनसमुदायाचा उल्लेख करताना त्यांनी, हा केवळ जनसागर नाही, (पान ४ वर)

> १९४७ मध्ये देशाला ब्रिटिश सत्तेतून स्वातंत्र्य मिळाले, हा दिवस निश्चितच ऐतिहासिक आहे. मात्र त्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय सत्तांविरोधात लढा देत स्वराज्य उभे केले आणि जनतेला स्वाभिमानाचा मार्ग दाखवला. विविध सत्तांच्या जोखडातून समाजाला मुक्त करून स्वतंत्र राज्यव्यवस्था निर्माण केली. त्यामुळे त्यांच्या दृष्टीने भारताचा पहिला स्वातंत्र्यदिन कोणता असेल, तर तो छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा दिवसच आहे. त्यामुळे शिवभक्तांना स्वराज्याचा इतिहास आणि त्यामागील प्रेरणा जपण्याचे कार्य करावे.
>
> **– संभाजीराजे छत्रपती**

# देवस्थानांना मिळणार जमिनींचे हक्क

## मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची माहिती; डिसेंबरमध्ये नवा कायदा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** राज्यातील अनेक देवस्थानांच्या जमिनींवर कूळ कायदा लागू आहे, तर काही ठिकाणी दीर्घकाळापासून वहिवाट सुरू आहे. त्यामुळे जमीन देवस्थानाच्या नावावर असली तरी त्याचा उपयोग संबंधित संस्थांना करता येत नाही. अनेक प्रभावशाली व्यक्तींनी या जमिनींवर अतिक्रमण केल्याने देवस्थानांना आपले हक्क मिळवणे कठीण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर महसूल विभागाने पुढाकार घेत देवस्थानांच्या जमिनींबाबत स्वतंत्र कायदा करण्याचा निर्णय घेतला होता. देवस्थानांचे हक्क पुन्हा प्रस्थापित व्हावेत आणि त्यांना त्यांच्या जमिनींचा लाभ मिळावा, हा सरकारचा उद्देश असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

नागपुरात प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी शिवराज्याभिषेक दिनाच्या शुभेच्छा दिल्या आणि देवस्थान इनाम निर्मूलन कायद्याबाबत सविस्तर माहिती दिली.

राज्यात सुमारे ५.५ लाख हेक्टर देवस्थान इनाम जमिनी असून या जमिनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून विविध देवस्थानांना देण्यात आल्या होत्या. मात्र कालांतराने या जमिनींवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली असून अनेक ठिकाणी देवस्थानांचा प्रत्यक्ष ताबा राहिलेला नाही, असे त्यांनी सांगितले.

या संदर्भातील कायद्याचा प्रारूप ६ मे रोजी सार्वजनिक करण्यात आला होता. त्यावर सूचना आणि हरकती नोंदवण्यासाठी ५ जूनपर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र या मुद्यावर मोठ्या प्रमाणात आक्षेप आणि सूचना प्राप्त झाल्याने सरकारने सध्या हा प्रारूप स्थगित करण्याचा निर्णय (पान ४ वर)

> डिसेंबरमधील हिवाळी अधिवेशनात हा सुधारित कायदा सादर करण्याचा सरकारचा मानस आहे. ज्या जमिनी १०० किंवा २०० वर्षांपासून देवस्थानांच्या ताब्यात नाहीत, त्या जमिनींबाबत स्वतंत्र निर्णय घ्यावा लागेल, असेही बावनकुळे म्हणाले. काही जमिनी सरसकट देवस्थानांना परत देता येतील, तर काही प्रकरणांत वेगळा मार्ग शोधावा लागेल. मात्र कोणत्याही परिस्थितीत देवस्थानांचे हक्क सुरक्षित राहतील आणि साडे ५ लाख हेक्टर जमिनींचे संरक्षण होईल, असा कायदा राज्यात आणण्याचा सरकारचा निर्धार आहे.
>
> **– चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री**

# राज्य सरकार अत्यंत असंवेदनशील

## खा. सुप्रिया सुळे यांचा सरकारवर हल्लाबोल



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे :** महाराष्ट्र सरकार हे कमालीचे असंवेदनशील असून ते राज्यातील जनतेच्या गंभीर प्रश्नांकडे गांभीर्याने पाहत नाही. सध्या देश आणि महाराष्ट्र दोन्हीही मोठ्या आर्थिक अडचणीतून जात असून, आगामी काळात राज्यासमोर मोठी आर्थिक आव्हाने उभी ठाकणार आहेत. सरकारने इतर गोष्टींपेक्षा या महत्त्वाच्या मुद्द्यावर लक्ष देणे गरजेचे आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. त्यातच राज्यातील आरक्षणाचा मुद्दा असो की शेतकऱ्यांचे प्रश्न, हे सरकार सर्वच बाबी चुकीच्या पद्धतीने हाताळत असून यामुळे राज्यात विनाकारण जाती-जातींमध्ये वाद निर्माण होत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली.

खा. सुळे म्हणाल्या की, सुप्रिया सुळे म्हणाल्या की, पुणे विधान परिषदेची जागा लढायची नाही हे मविआतील तिन्ही पक्षाच्या नेत्यांनी मिळून घेतलेला निर्णय आहे. आमची त्यादिवशी बैठक झाली त्या बैठकीत हा निर्णय (पान ४ वर)

> माणसं पैशांपेक्षा प्रेमाने जिंकता येतात, हे समजलं तर अशा प्रकारचं विधेयक आणण्याची गरजच पडणार नाही. मात्र, निवडणूक प्रक्रियेत सुधारणा व्हायला हव्यात, या मताशी त्यांनी सहमती दर्शवली. या संदर्भात कोणी विधेयक आणत असेल तर त्याला आपला विरोध नाही. निवडणूक व्यवस्थेत आवश्यक बदल झाले पाहिजेत.
>
> **– देवेंद्र फडणवीस, फडणवीस**

## संमिश्र

### कॉकरोच जनता पार्टीचे आंदोलन

**नवी दिल्ली :** नीट परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याच्या मुद्द्यावरून कॉकरोच जनता पार्टीने शनिवारी दिल्लीतील जंतर-मंतर येथे पाच तास आंदोलन केले. कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पाच दिवसांच्या आत राजीनामा द्यावा, अशी मागणी केली; तसेच, तसे न केल्यास पुढील शनिवारी पुन्हा जंतर-मंतरवर आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला. सोनम वांगचुक यांनी अभिजीत दीपके यांच्यासह मंचावर जाऊन आंदोलकांना शांततापूर्ण मार्गाने निदर्शने करण्याचे आवाहन केले. सोनम वांगचुक यांनी अभिजीत दीपके यांच्यासह मंचावर जाऊन आंदोलकांना शांततापूर्ण मार्गाने निदर्शने करण्याचे आवाहन केले.

### मान्सून झाला महाराष्ट्रात दाखल

**मुंबई :** तमाम महाराष्ट्र वासीयांसाठी एक आनंदाची बातमी. ज्याची वाट आपण चातक चोचीने पाहत होता, तो मान्सून अखेर महाराष्ट्रात दाखल झालाय. गोवा, दक्षिण महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळ, मुसळधार पाऊस आणि ताशी ४०-५० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता वर्तवण्यात आलीय. उत्तर कोकण, उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, हलका ते मध्यम पाऊस आणि ताशी ४०-५० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. उत्तर कोकणातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता आहे.

### विरोधी पक्ष संपणार नाही : खा. राऊत

**मुंबई :** भाजप सांगतो म्हणून काही देशातील विरोधी पक्ष संपणार नाही. काही दिवसांनी लोकं सत्ताधाऱ्यांच्या मागे चपला घेऊन धावतील. त्यावेळी यांनाच वाटेल की जमीनीने आपल्याला सामावून घ्यावे, असे उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. तर इंडिआ आघाडीच्या बैठकीला सर्वच पक्षाचे नेते हजर राहणार आहेत, काही जण ऑनलाईन बैठकीला उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. संजय राऊत म्हणाले की, विधान परिषद बरखास्त करा असे सुधीर मुनगंटीवार यांना का वाटत आहे? या संदर्भात त्यांनी पत्रकार परिषद त्यांच्या पक्षाच्या नेत्यांसोबत घेतली पाहिजे.




# सभापतींच्या धोरणांविरोधात सदस्य एकवटले

## कोपरगाव बाजार समितीत सामूहिक राजीनामे



> संस्थेची अधोगती होत असतांना पदावर राहून मुकाट्याने पाहत बसणे हे शेतकरी बांधवांशी बेईमानी ठरेल. त्यामुळे संस्थेच्या हिताला बाधा पोहोचविणाऱ्या निर्णयांचा भाग होवून अशा चुकीच्या कारभाराचे भागीदार होण्यापेक्षा आम्ही स्वखुशीने राजीनामा देण्याचा कठोर पण तितकाच आवश्यक निर्णय घेतला तो फक्त आणि फक्त शेतकरी आणि संस्थेच्या हितासाठी घेतला आहे.
>
> **– गोवर्धन परजणे, उपसभापती**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विद्यमान सभापतींकडून सुरू असलेला अनागोंदी कारभार, आर्थिक उधळपट्टी आणि शेतकरी हिताकडे होत असलेल्या दुर्लक्षाच्या निषेधार्थ उपसभापतींसह काही सदस्यांनी सामूहिक राजीनामे दिले असल्याची माहिती विद्यमान उपसभापती गोवर्धन परजणे यांनी दिली आहे.

उपसभापती गोवर्धन परजणे यांनी म्हटले आहे की, कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समिती ही शेतकऱ्यांची कामधेनू आहे. आमचे नेते आ. आशुतोष काळे यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून शेतकरी हित जोपासले जावे (पान ४ वर)

# आमदारांनीच पकडला दारूचा अड्डा

## दारूविक्रीचा पर्दाफाश; आ. लहामटेंकडून कारवाईचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** निळवंडे गावच्या शिवारात सुरू असलेली अवैध दारूविक्री चक्क आमदारांनीच पकडून दिल्याची घटना घडली. यामुळे तालुक्यातील पोलिस आणि उत्पादन शुल्क यंत्रणेचे पितळ उघडे पडले आहे.

एका कार्यक्रमानिमित्त आ. डॉ. किरण लहामटे हे राजूर येथून निळवंडेमार्गे सांगवीकडे जात असताना, निळवंडे शिवारात एके ठिकाणी त्यांना संशयास्पद गर्दी दिसली. त्याची चौकशी करीत असतानाच आमदाराना पाहताच लोकांनी तेथून पळ काढला. या ठिकाणी एका घरात अवैधरित्या देशी दारूविक्री होत असल्याचे त्यांना दिसून आले.



१०० देशी दारूच्या बाटल्या सापडल्या. विशेष म्हणजे ऑनलाइन पैसे घेण्यासाठी तेथे स्कॅनरही होता. शिवाय घरच्या मागे एक कोपऱ्यात रिकाम्या दारू बाटल्यांचा खच पडलेला त्यांना आढळला. याचा अर्थ बऱ्याच दिवसांपासून तेथे अवैध दारू विक्री सुरू असावी.

आमदारांनी अधिक माहिती घेतली असता मेहेंदुरी येथील एक ग्रामपंचायत कर्मचारी या ठिकाणी अवैध दारू विक्री करत असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी पोलिसांशी संपर्क साधून या घटनेची माहिती दिली व संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्याचे आदेश दिले. या ठिकाणी एक दुचाकी आढळली. त्या दुचाकीची हवा सोडण्यात आली. (पान ४ वर)

> अकोल्यात अवैध दारूविक्री, गुटखाविक्री आणि इतर बेकायदेशीर धंदे पूर्णपणे बंद व्हावेत यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत. तरुण पिढीचे भविष्य व्यसनामुळे उद्ध्वस्त होऊ नये, समाजात सुसंस्कृत आणि सक्षम युवक घडावेत हीच आपली भूमिका आहे. अवैध धंदे करणाऱ्यांनी आताच सावध व्हावे. कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही. अवैध व्यवसाय करणाऱ्यांवर कोणतीही दया दाखवली जाणार नाही. दोनपेक्षा अधिक गुन्हे दाखल असलेल्या व्यक्तींविरुद्ध तडीपारीसह आवश्यक कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
>
> **– किरण लहामटे, आमदार**

# राज्यात हमीभावाने कांदा खरेदीला मंजुरी

## आ. विवेक कोल्हे यांच्या मागणीला यश; कांदा खरेदी सुरू होणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** कृषी उत्पन्न बाजार समितीसह राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये नाफेड व एनसीसीएफमार्फत हमीभावाने कांदा खरेदी सुरू करण्याची मागणी आ. विवेक कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पणनमंत्री जयकुमार रावल यांच्यासह एनसीसीएफ व नाफेडकडे केली होती त्यास सकारात्मक प्रतिसाद देत या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णय घेत हमीभावाने कांदा खरेदीस मान्यता दिली



असून याबद्दल आ. विवेक कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहे.

महाराष्ट्र राज्यात कांद्याच्या बाजारभावात झालेल्या घसरणीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते. उत्पादन खर्च वाढत असताना मिळणारा कमी दर शेतकऱ्यांसाठी चिंतेचा विषय बनला होता. या पार्श्वभूमीवर आ. विवेक कोल्हे यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे नाफेड व एनसीसीएफमार्फत कांदा खरेदी तातडीने सुरू करण्याची मागणी केली होती.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून संबंधित यंत्रणांना आवश्यक निर्देश दिल्यानंतर हमीभावाने कांदा खरेदीची प्रक्रिया सुरू झाली आहे. नाफेड आणिएनसीसीएफची (पान४वर)

### आ. कोल्हेंमुळेच उत्पादकांना दिलासा

नाफेड व एनसीसीएफमार्फत हमीभावाने कांदा खरेदी सुरू होणार असून कांदा उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य दर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून आ. विवेक कोल्हे यांच्या पाठपुराव्याला यश आल्याची भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.



# तापमान वाढ रोखण्यासाठी वृक्ष संवर्धन आवश्यक

## माजी मंत्री बाळासाहेब थोरात; कारखानास्थळावर पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**
**संगमनेर** : वॉर्मिंगच्या समस्येमुळे पृथ्वीचे तापमान वाढले आहे, वाढलेली उष्णता, कमी झालेला पाऊस, दुष्काळ, पर्यावरणाचा असमतोल हा सजीव सृष्टीसाठी धोकादायक असून हे टाळण्यासाठी पर्यावरण संवर्धन हे अत्यंत गरजेचे आहे. याकरता येणाऱ्या पावसाळ्यात प्रत्येकाने किमान दोन झाड लावून त्याचे संवर्धन केले पाहिजे. तापमान वाढ रोखण्यासाठी वृक्षारोपण व संवर्धन अत्यंत महत्त्वाचे असल्याचे काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य लोकनेते माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना येथे आंतरराष्ट्रीय जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी दंडकारण्य अभियान आढावा घेण्यात आला.

याप्रसंगी माजी मंत्री बाळासाहेब थोरात, दंडकारण्य अभियानाचे मुख्य प्रवर्तक मा. आ. डॉ सुधीर तांबे, पांडुरंग पाटील घुले, दुर्गाताई तांबे, संपतराव डोंगरे, तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, रामहरी कातोरे, सुनील कडलग, रावसाहेब दुबे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, जगन्नाथ घुगरकर, समन्वयक दशरथ वर्पे, डॉ सुजित खिलारी, अनिल थोरात, सेक्रेटरी किरण कानवडे, प्रा. व्ही. बी. धुमाळ, कृष्णा दिघे, बाळासाहेब फापाळे, वन विभागाच्या अधिकारी श्रीमती हिरे, संतोष पारधी, परते यांच्यासह विविध विभाग प्रमुख व कार्यकर्ते उपस्थित होते.

माजी मंत्री थोरात म्हणाले की, जगापुढे ग्लोबल वार्मिंगची मोठी समस्या निर्माण झाली आहे. वाढती उष्णता कमी झालेला पाऊस हे अत्यंत चिंतेचे आहे. यावर्षी देशांमध्ये कमी पाऊस सांगितला आहे. पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास यामुळे या



समस्या होत असून यापुढील काळात प्रत्येकाने पर्यावरण संवर्धन केलेच पाहिजे.दंडकारण्य अभियानाच्या माध्यमातून पर्यावरण व वृक्ष संवर्धन संस्कृती तालुक्यात वाढली असून सहकारातील विविध संस्थांनी तालुक्यातील डोंगरांवर वृक्षारोपण करून संवर्धन केले आहे. यावर्षीही प्रत्येक नागरिकांनी जास्तीत जास्त वृक्षारोपण करून ते जपावे असे आवाहन त्यांनी केले. डॉ. तांबे म्हणाले की, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी सजीव सृष्टीच्या रक्षणाकरता दंडकारण्य अभियान सुरू केले. तालुक्यामध्ये हे व्रत म्हणून काम सुरू आहे. वृक्ष संवर्धन संस्कृती वाढली आहे. हिरवाई निर्माण होत आहे यापुढील काळातही गावोगावी प्रत्येक व्यक्तीने वृक्ष संवर्धन करणे अत्यंत गरजेचे असल्याचे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पांडुरंग घुले यांनी केले. तर दशरथ वरपे यांनी आभार मानले. कारखाना कार्यक्षेत्रात १०१ अंबा वृक्षांची रोपण यावेळी करण्यात आले.

### दंडकारण्य अभियानाचा तांबेंकडून आढावा

माजी मंत्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुक्यात सहकारी संस्थांच्या वतीने दंडकारण्य अभियान राबवले जात आहे. वृक्षारोपण संवर्धन उन्हाळ्यामध्ये पाणीटंचाई, येणाऱ्या अडचणींमधून ही अनेक वृक्ष जगली असून या पुढील काळातही अधिक सातत्याने व सतर्कतेने सर्वांनी काम करावे अशा सूचना देत मागील वर्षीच्या कामाचा आढावा डॉ. सुधीर तांबे यांनी घेतला.

# वादळाचा तडाखा; नुकसानीचे तातडीने पंचनामे करा

## आ. विवेक कोल्हे यांचे प्रशासनाला निर्देश

**जनता आवाज वृत्तसेवा**
**कोपरगाव** : तालुक्यात विविध भागांत झालेल्या वादळी पावसामुळे नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून बाधितांना तातडीने दिलासा मिळावा यासाठी नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

तालुक्यात अनेक ठिकाणी वादळामुळे घरांवरील पत्रे उडून गेली असून ग्रीन हाऊस, पॉली हाऊस तसेच कांद्याच्या चाळींच्या छतांचे नुकसान झाले आहे. काही भागांत मोठी झाडे उन्मळून पडल्याने शेती आणि मालमत्तेचेही नुकसान झाल्याच्या घटना घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी तहसीलदार महेश सावंत यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत परिस्थितीचा आढावा घेतला.



### बांधितांना मदतीसाठी तहसिलदारांना सूचना

यावेळी त्यांनी प्रशासनाने प्रभावित भागांना तातडीने भेट देऊन नुकसानीची नोंद घ्यावी व पंचनाम्यांची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करावी, अशा सूचना दिल्या. वादळग्रस्त नागरिकांना शासनाच्या विविध मदत योजनांचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतही त्यांनी प्रशासनाशी चर्चा केली.

गावागावांत झालेल्या नुकसानीची माहिती संकलित करून प्रभावित कुटुंबांना शक्य तितक्या लवकर मदत मिळावी, यासाठी यंत्रणांनी संवेदनशीलतेने काम करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. वादळामुळे अनेक कुटुंबांचे आर्थिक नुकसान झाले असून अशा परिस्थितीत प्रशासनाने मदतकार्याला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, नुकसानीग्रस्त नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाशी संपर्क साधून आपल्या नुकसानीची माहिती द्यावी, असे आवाहनही करण्यात आले आहे. तालुक्यातील नुकसानीचा संपूर्ण अहवाल तयार झाल्यानंतर शासनाकडे मदतीचा प्रस्ताव सादर करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

# वृक्ष हे भावी पिढ्यांसाठी अमूल्य ठेवा

## प्रा. माणिक विधाते; चाँदबीबी महाल परिसरात वृक्षारोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**
**अहिल्यानगर** : पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज बनली आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा वाढता वापर यामुळे पर्यावरणासमोर गंभीर आव्हाने निर्माण झाली आहेत. अशा परिस्थितीत प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. वृक्ष हे केवळ पर्यावरणाचे रक्षक नसून भावी पिढ्यांसाठी अमूल्य ठेवा असल्याचे प्रतिपादन प्रा. माणिक विधाते यांनी केले.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी वर्षभर विविध उपक्रम राबविणाऱ्या हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाची सुरुवात श्री विशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आली. त्यानंतर डोफ्लगर परिसर व चाँदबीबी महाल परिसरात स्वच्छता अभियान राबवून प्लास्टिक व इतर कचरा संकलित करण्यात आला. पर्यावरणाला घातक ठरणाऱ्या प्लास्टिकच्या वापराविरोधात जनजागृती करण्यात आली. विशेष म्हणजे लावण्यात आलेल्या प्रत्येक वृक्षाच्या संगोपन व संवर्धनाची जबाबदारी ग्रुपच्या सदस्यांनी स्वीकारली.

यावेळी हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, राजू कांबळे, पवन वाघमारे, रमेश वराडे, जहीर सय्यद, सचिन चोपडा, सर्वेश



> पर्यावरणाच्या रक्षणासाठी वृक्षारोपण आणि संवर्धन अत्यंत आवश्यक आहे. वाढते प्रदूषण रोखण्यासाठी, जमिनीची धूप थांबविण्यासाठी, पावसाचे प्रमाण संतुलित ठेवण्यासाठी आणि ऑक्सिजनची उपलब्धता वाढविण्यासाठी वृक्षारोपण महत्त्वाची भूमिका बजावते. एकीकडे औद्योगिकीकरणामुळे विकास होत असला तरी दुसरीकडे पर्यावरणाचा ऱ्हास वाढत आहे. प्लास्टिकचा वाढता वापर पर्यावरण आणि पशुपक्ष्यांसाठी धोकादायक ठरत आहे.
>
> **– संजय सपकाळ**

सपकाळ, मेजर दिलीप ठोकळ, अशोक पराते, ताराचंद ठोकळ, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, अविनाश पोतदार, अभिजीत सपकाळ, यशराज माने, मनोज मेहेर, सायकलपटू त्रिंबकराव नेटके, सचिन पेंढूरकर, दिलीप गुगळे, नवनाथ वेताळ, जालिंदर अळकुटे, रामनाथ गर्जे, दीपक धाडगे यांच्यासह आदी पर्यावरणप्रेमी नागरिक उपस्थित होते.

# भटके विमुक्त समाजाची जनगणना व्हायला हवी

## डॉ. अरुण जाधव; खर्डा येथून मुशाफिरी यात्रेचा शुभारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**
**खर्डा** : भटके विमुक्त आदिवासी समाज हा उदरनिर्वाहासाठी सतत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करत असल्याने अनेकदा शासकीय घरगणना व मुख्य जनगणनेपासून वंचित राहतो. या समाजाची अधिकृत नोंदच झाली नाही, तर शासनाच्या विविध विकास योजना, कल्याणकारी उपक्रम आणि मूलभूत सुविधांपासून हा समाज कायमचा दूर राहण्याची भीती आहे. त्यामुळे पालावर, तात्पुरत्या झोपड्यांमध्ये किंवा रस्त्यालगत वास्तव्यास असलेल्या प्रत्येक भटके विमुक्त आदिवासी कुटुंबाची घरगणना आणि जनगणना झालीच पाहिजे. एकही कुटुंब यापासून वंचित राहणार नाही, यासाठी प्रशासनासह समाजातील प्रत्येक घटकाने सजग राहावे, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते तथा नगरसेवक ॲड. डॉ. अरुण जाधव यांनी केले.

खर्डा येथील मदारी वस्तीवरील पालांमधून मुशाफिरी यात्रेचा शुभारंभ मोठ्या उत्साहात करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

भटक्या-विमुक्त समाजाच्या घरगणना आणि जनगणनेबाबत व्यापक जनजागृती घडवून आणण्यासाठी ही मुशाफिरी यात्रा सुरू करण्यात आली आहे. १४ जून २०२६ पर्यंत ही यात्रा महाराष्ट्रातील आठ जिल्ह्यांमध्ये विविध भागांत फिरणार आहे. यात अहमदनगर, पुणे, सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर आणि बीड जिल्ह्यांसह बारामती तालुक्यातही जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे.

या यात्रेदरम्यान प्रतिनिधी थेट भटके विमुक्त आदिवासी बांधवांच्या पालांवर, वस्त्यांवर आणि झोपड्यांमध्ये जाऊन घरगणना




व जनगणनेचे महत्त्व पटवून देणार आहेत. शासनाच्या योजनांचा लाभ मिळवण्यासाठी अधिकृत नोंद किती आवश्यक आहे, याविषयी समाजामध्ये जागरूकता निर्माण करण्यात येणार आहे.

कार्यक्रमात ग्रामीण विकास केंद्राच्या सचिवा उमाताई जाधव, ग्रामीण विकास केंद्राचे संचालक बापूसाहेब ओहोळ, ज्येष्ठ पत्रकार दत्तराज पवार, सुनील साळुंके, आदिवासी नेते विशाल पवार तसेच सलीम मदारी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी या यात्रेच्या उद्देशाचे कौतुक करत भटक्या-विमुक्त समाजाच्या हक्कांसाठी अशा चळवळींची आवश्यकता अधोरेखित केली.यावेळी पत्रकार धनसिंग साळुंके, मंगल शिंगाणे, उर्मिला कवडे, सचिन भिंगारदिवे, वैजिनाथ केसकर, जीवन परमार, पांडुरंग शिंगाणे, फकीर मदारी, वैशाली पवार, आशाबाई काळे, ताई पवार, लता काळे, उषा पवार, शारदा पवार, मुस्तफा मदारी यांच्यासह मदारी वस्तीतील नागरिक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष चव्हाण यांनी केले, तर उपस्थितांचे आभार निता इंगळे यांनी मानले.

# शेतरस्ते प्रश्नावर सरकारला अल्टिमेटम्

## मंत्रालयात शेकडो पुरावे सादर, शेतकऱ्यांच्या हक्कासाठी २३ कलमी निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**
**अहिल्यानगर** : राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या हक्काच्या शेतरस्त्यांचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिव-पाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे २३ कलमी मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. यावेळी राज्यभरातील शेकडो प्रलंबित शेतरस्ता प्रकरणांचे पुरावे मंत्रालयात सादर करून मिशन झिरो पेंडन्सी अभियान राबविण्याची जोरदार मागणी करण्यात आली.

शेतरस्ता हा शेतकऱ्यांचा मूलभूत हक्क असून शेती उत्पादन, सिंचन व्यवस्था, कृषी यंत्रसामुग्रीची ने-आण तसेच शेतीमाल बाजारपेठेत पोहोचविण्यासाठी अतिक्रमणमुक्त आणि दर्जेदार रस्ते अत्यावश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शासनाने शेतरस्ते अडविणाऱ्यांविरोधात कठोर धोरण स्वीकारले असले तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक अडचणी येत असल्याने हजारो प्रकरणे अद्याप प्रलंबित असल्याचे चळवळीच्या पदाधिकाऱ्यांनी निदर्शनास आणून दिले.

निवेदनामध्ये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ५(२) व १४३ मध्ये सुधारणा, शेतरस्ते खुले करण्यासाठी




विनाशुल्क पोलिस बंदोबस्त, प्रलंबित प्रकरणांचा कालबद्ध निपटारा, मोजणी व अतिक्रमण निर्मूलनासाठी स्वतंत्र निधी, शासकीय यंत्रसामुग्रीची उपलब्धता, डिजिटल पुराव्यांचा वापर, पारदर्शक कार्यपद्धती, स्वतंत्र नियंत्रण कक्ष, ग्रामस्तरीय शेतरस्ता समित्या तसेच शिव-पाणंद रस्त्यांसाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्यासह विविध महत्त्वपूर्ण मागण्या करण्यात आल्या आहेत.

यावेळी महाराष्ट्र राज्य शिव-पाणंद शेतरस्ता चळवळीचे नेते शरद पवळे, रविंद्र खुडे, नाथाभाऊ शिंदे पाटील, बाळासाहेब थोरात, दशरथ खापरे, सुरेश वाटपाडे, पोपट शेळके, नानाजी शिंदे, गंगाधर वलवे, अशोक कचरे, विठ्ठल निर्मळ, विजय शेलार, सचिन शेळके आदी शेतकरी मंत्रालयात उपस्थित होते.

# रेणावीकर विद्यालयाचे दुहेरी यश

## गौरी साठे जिल्ह्यात प्रथम; ५०० पैकी ४९८ गुण

**जनता आवाज वृत्तसेवा**
**अहिल्यानगर** : सावेडी येथील रेणावीकर माध्यमिक विद्यालयाने माध्यमिक शालांत परीक्षा मार्च २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. यंदाच्या निकालात विद्यालयाने दुहेरी यश मिळवले असून विद्यार्थिनी कुमारी गौरी मुकेश साठे हिने तब्बल ५०० पैकी ४९८ गुण मिळवत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

अहिल्यानगरमधील नामांकित शिक्षणसंस्था म्हणून ओळख असलेल्या रेणावीकर माध्यमिक विद्यालयाच्या निकालाने पुन्हा एकदा शैक्षणिक क्षेत्रात आपली वेगळी छाप उमटवली आहे. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा नुकताच विद्यालयात उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला शाळा समितीचे अध्यक्ष डॉ. राजीव हाजीरनीस प्रमुख उपस्थित होते. त्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांची उपस्थिती लक्षणीय होती. कार्यक्रमाला प्रशालेचे मुख्याध्यापक राजेंद्र कांबळे, नूतन मुख्याध्यापक चंदू गवळी, शाळा समितीचे महामात्र डॉ. उमेश बिबवे, सदस्य पिंपळे, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निकालात कुमारी गौरी मुकेश साठे हिने ९९.६० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला. चिरंजीव राघव शिरीष व्हरसाळे याने ९८.८० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक तर सिद्धा आशिष चाकवते हिने ९६.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला.

विशेष म्हणजे विद्यालयातील पाच विद्यार्थ्यांना संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण मिळाले आहेत. यात नम्रता घोलप, ज्ञानेश्वरी बारस्कर, गौरी ढवण, चिरंजीव राघव व्हरसाळे आणि कुमारी सिद्धा चाकवते यांचा समावेश आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहल उपाध्ये यांनी केले. तर उपस्थितांचे आभार शैलेश बोरुडे यांनी मानले.

# नागरिकांनो, वृक्ष संवर्धनासाठी पुढाकार घ्या

## हरिष दसरे; पर्यावरण दिनानिमित्त जुन्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात वृक्षारोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**
**अहिल्यानगर** : वाढते तापमान, झपाट्याने होणारे शहरीकरण आणि दिवसेंदिवस बिघडत चाललेला पर्यावरणाचा समतोल यामुळे वृक्ष संवर्धनाची गरज अधिक तीव्र झाली आहे. पर्यावरण संरक्षणासाठी केवळ शासन किंवा प्रशासनावर अवलंबून न राहता प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेऊन वृक्ष लागवड व संवर्धनाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे, असे प्रतिपादन भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाचे संरक्षण सहाय्यक हरिष दसरे यांनी केले.

०५ जून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जुन्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नगर उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी हरिष दसरे प्रमुख उपस्थित म्हणून बोलत होते.

दसरे म्हणाले की, गेल्या काही वर्षांपासून पर्यावरणाचा समतोल मोठ्या प्रमाणात ढासळत असून त्याचा थेट परिणाम मानवी जीवनावर होत आहे. शहरांमध्ये काँक्रीटीकरण वाढल्यामुळे तापमानात सातत्याने वाढ होत आहे. प्रदूषणाचे प्रमाणही चिंताजनकरीत्या वाढत असून भविष्यातील पिढ्यांसाठी स्वच्छ व सुरक्षित पर्यावरण निर्माण करण्यासाठी वृक्ष संवर्धन हा एकमेव प्रभावी उपाय आहे.

शासन विविध स्तरांवर वृक्षारोपण मोहिमा राबवत असले तरी त्याचे यश नागरिकांच्या सक्रिय सहभागावर अवलंबून असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनीही पर्यावरण संवर्धनाबाबत चिंता व्यक्त केली.

कार्यक्रमादरम्यान संवर्धन आणि देखभाल सुलभ व्हावी या उद्देशाने ८ ते १० फूट उंचीची करंज जातीची झाडे परिसरात लावण्यात आली. या झाडांमुळे परिसराचे सौंदर्य वाढण्याबरोबरच पर्यावरण संतुलन राखण्यास मदत होणार असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

या वृक्षारोपण कार्यक्रमास अहमदनगर वस्तुसंग्रहालयाचे अभिरक्षक संतोष यादव, नारायण आव्हाड, संदीप हापसे, योगेश पवार, हरीभूमी प्रतिष्ठानचे



अभय ललवाणी, उल्हास नांगरे, रिजवान कादर शेख यांच्यासह विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमातून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देत अधिकाधिक वृक्ष लागवड करण्याचे आवाहन करण्यात आले.

> गेल्या काही वर्षांमध्ये शहरी भागातील तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे जात आहे. ही परिस्थिती निसर्गाने दिलेली गंभीर चेतावणी आहे. त्यामुळे शहरांमध्ये उपलब्ध मोकळ्या जागांमध्ये मोठ्या प्रमाणावर भारतीय प्रजातीतील सावली देणाऱ्या वृक्षांची लागवड करणे आणि त्यांचे संगोपन करणे अत्यंत आवश्यक आहे.
>
> **– हरिष दसरे**

# मोगऱ्याच्या फुलांनी सजली स्वामींची मूर्ती

**जनता आवाज वृत्तसेवा**
**अहिल्यानगर** : सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवरील श्री. स्वामी समर्थ मंदिरात आदिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या मोगरा महोत्सवाने भाविकांना भक्तिरसात न्हाऊ घातले. संपूर्ण मंदिर परिसर मोगऱ्याच्या सुगंधाने दरवळून गेला असून आकर्षक फुलसजावटीमुळे मंदिराचे वातावरण अधिकच प्रसन्न आणि भक्तिमय झाले होते.गेल्या तीन आठवड्यांपासून मंदिरात आदिक मासानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दररोज रुद्राभिषेक, पोथी वाचन, विष्णुयाग तसेच विविध धार्मिक विधी भक्तिभावाने पार पडले. या कार्यक्रमांना परिसरातील स्वामीभक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

शुक्रवारी सकाळी भाविक विजय पानमळकर यांनी मोगऱ्याच्या फुलांनी श्री स्वामी समर्थांच्या मूर्तीची आकर्षक सजावट केली. पांढऱ्याशुभ्र मोगऱ्याच्या फुलांनी सजलेली स्वामींची मूर्ती पाहून भाविक मंत्रमुग्ध झाले. मंदिरातील ही विशेष सेवा आणि सजावट पाहण्यासाठी दिवसभर भक्तांची गर्दी होत होती.

मोगऱ्याच्या सुगंधाने संपूर्ण मंदिर परिसर भारावून गेला होता. भक्तांनी स्वामींच्या चरणी नतमस्तक होत शांतता, समाधान आणि भक्तीचा अनुभव घेतला. मंदिर समितीच्या वतीने आदिक मासानिमित्त सुरू असलेले धार्मिक उपक्रम पुढील काही दिवस सुरू राहणार असल्याची माहिती देण्यात आली.

# पाण्याच्या प्रश्नाने माळी बाभुळगावकर त्रस्त

## वायकर-शेख यांचा आंदोलनाचा इशारा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : पाथर्डी शहरालगतच्या माळीबाभुळगाव येथे आमदार मोनिका राजळे यांच्या प्रयत्नातून जलजीवन मिशन योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या पिण्याच्या पाणीपुरवठा योजनेचे काम गेल्या वर्षभरापासून रखडल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. पाण्याच्या टाकीचे बांधकाम अर्धवट अवस्थेत असून गावातील नवीन पाईपलाईनच्या कामालाही अद्याप सुरुवात झालेली नसल्याने नागरिकांना पाण्यासाठी हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत.

या पार्श्वभूमीवर माजी सरपंच संदीप वायकर व ग्रामपंचायत सदस्य रुबाब शेख यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला निवेदन देत येत्या आठ ते दहा दिवसांत काम सुरू न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. माळीबाभुळगाव हे गाव पाथर्डी शहरालगत असल्याने येथे नागरीकरणाचा वेग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. गावाच्या हद्दीलगत विविध व्यावसायिक आस्थापना उभ्या राहिल्या असून शिक्षक कॉलनी, समर्थ नगर, तारकेश्वरनगरी यांसारख्या अनेक वस्त्याही विकसित झाल्या आहेत.

परिणामी गावाची लोकसंख्या व पाण्याची मागणी दिवसेंदिवस वाढत असताना त्या प्रमाणात मूलभूत सुविधांचा विकास झालेला नाही. विशेषतः पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे.

शासनाच्या जलजीवन मिशन योजनेअंतर्गत गावासाठी पाण्याची उंच टाकी व पाईपलाईन मंजूर करण्यात आली होती. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत टाकीचे काम सुरूही करण्यात आले; मात्र सुमारे वर्षभरापासून हे काम बंद असून टाकी अर्धवट अवस्थेत उभी आहे. माजी सरपंच संदीप वायकर आणि ग्रामपंचायत सदस्य रुबाब शेख यांनी दिलेल्या निवेदनात अर्धवट राहिलेल्या पाण्याच्या टाकीचे काम तसेच नवीन पाईपलाईनचे काम येत्या आठ ते दहा दिवसांत प्रत्यक्ष सुरू करावे, अन्यथा ग्रामस्थांच्या वतीने तीव्र लोकआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा दिला आहे. निवेदनाच्या प्रती आमदार मोनिका राजळे, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व गटविकास अधिकारी यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

### वाढती वस्ती; सुविधांचा अभाव

पाथर्डी शहरालगत असल्याने माळीबाभुळगाव परिसरात गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर नागरी विस्तार झाला आहे. नवीन कॉलन्या, व्यावसायिक प्रतिष्ठाने आणि वाढती लोकसंख्या यामुळे पाणी, रस्ते व इतर मूलभूत सुविधांची गरज वाढली आहे. मात्र विकासाच्या तुलनेत सुविधा उपलब्ध होत नसल्याने नागरिकांमध्ये असंतोष वाढत असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सध्या सर्वाधिक ऐरणीवर आला आहे.

# स्वच्छता कर्मचाऱ्याने दागिने केले परत



**जनता आवाज वत्तसेवा**

**शिर्डी** : साईबाबांच्या नगरी शिर्डीत - पुन्हा एकदा प्रामाणिकपणाचा आदर्श समोर आला आहे. साईबाबा हॉस्पिटलच्या बाहेरील पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणी स्वच्छता कर्मचारी रेखा रवींद्र अवचिते यांना १ लाख ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने सापडले. त्यांनी कोणताही मोह न करता ते दागिने तातडीने साईबाबा संस्थानच्या संरक्षण कार्यालयात जमा केले.

दिनांक ५ जून रोजी रेखा अवचिते नेहमीप्रमाणे हॉस्पिटल परिसराची स्वच्छता करत होत्या. पाण्याच्या ठिकाणी त्यांना जमिनीवर एक छोटी पिशवी दिसली. ती उघडून पाहिल्यावर त्यात १ तोळा वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र आणि कानातले दागिने होते. पहिल्यांदा वाटले एखाद्या भाविकाचे असावे, पण हे आपले नाही, त्यामुळे ते मूळ मालकापर्यंत पोहोचवायचेच, असे रेखा अवचिते यांनी सांगितले. त्यांनी तातडीने - हे दागिने संरक्षण कार्यालयाकडे सुपूर्द - केले. यानंतर संस्थानच्या सुरक्षा विभागाने चौकशी सुरू केली.

तपासात असे कळले की, हे दागिने शिर्डीलगतच्या पिंपळवाडी येथील मीराबाई गांगुर्डे यांचे आहेत. त्या उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये आल्या होत्या. घाईगडबडीत त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र आणि कानातले पाण्याच्या ठिकाणी निसटून पडले होते. मीराबाई यांचा मुलगा दत्तात्रय गांगुर्डे संरक्षण कार्यालयात आला. त्याने दागिन्यांची अचूक ओळख पटवून दिली आणि कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर हे दागिने ताब्यात घेतले.

दागिने परत मिळाल्यावर त्यांचे कुटुंबीय भावुक झाले. अधिकारी गोरक्ष गाडिलकर आणि मंदिर सुरक्षा अधिकारी रोहिदास माळी यांनी त्यांचे जाहीर कौतुक केले.

# सलून सेवांच्या दरात २० टक्के वाढ

## महागाईच्या वादळात अडकला सलून व्यवसाय

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : केस कापणारा, दाढी करणारा, लग्नसमारंभापासून ते प्रत्येक शुभकार्यामध्ये समाजाचा अविभाज्य भाग असलेला नाभिक समाज आज स्वत:च्या अस्तित्वासाठी संघर्ष करत आहे. ग्राहकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारा सलून व्यवसाय गेल्या काही वर्षांत वाढती महागाई, आर्थिक मंदी आणि वाढत्या खर्चाच्या ओझ्याखाली अक्षरश: दबला गेला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नाभिक महामंडळाने राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील सलून सेवांच्या दरामध्ये २० टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला असून, ही दरवाढ ६ जून २०२६ पासून लागू करण्यात आली आहे.

हा निर्णय केवळ दरवाढ नसून, राज्यातील हजारो सलून व्यावसायिक आणि त्यांच्या कुटुंबांच्या जगण्याचा प्रश्न असल्याचे नाभिक महामंडळाचे राज्याध्यक्ष सयाजी झुंजार यांनी स्पष्ट केले. गेल्या काही महिन्यांपासून जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या अस्थिर परिस्थितीचा फटका सर्वसामान्य नागरिकांसह छोट्या व्यावसायिकांनाही बसत आहे. आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे इंधन दरात झालेली वाढ



आता प्रत्येक वस्तू आणि सेवेमध्ये दिसून येत आहे. वाहतूक खर्च वाढल्यामुळे बाजारातील प्रत्येक वस्तू महाग झाली आहे. मात्र ग्राहकांना परवडावे म्हणून अनेक सलून व्यावसायिकांनी स्वत:चा नफा कमी करून सेवा सुरू ठेवल्या. पण आता परिस्थिती अशी झाली आहे की, जुने दर ठेवून व्यवसाय चालवणे अशक्य झाले आहे.

# अतिक्रमणाची तक्रार; कारवर दगडफेक

## सावेडीतील चार जणांवर गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : सावेडी परिसरातील नगर-मनमाड रोडवर अतिक्रमणाची तक्रार केल्याने एका किराणा दुकानदाराची कार अडवून त्यावर पाठीमागून दगडफेक केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात सावेडीतील चार जणांविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

संतोष नामदेव वाकळे (वय ३३, रा. वाकळे मळा, बालिकाश्रम रोड, सावेडी) यांनी यासंदर्भात तोफखाना पोलीस ठाण्यात रीतसर फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सोपान भगवान वाकळे, किशोर भगवान वाकळे, प्रसाद सुरेश वाकळे (तिघे रा. अर्जुन वॉशिंग सेंटर शेजारी, सावेडी) आणि केतन ठाणगे (रा. तपोवन रोड, सावेडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी संतोष वाकळे यांचे सावेडी येथील आरोग्य सदन हॉस्पिटलसमोर किराणा दुकान आहे. त्यांचे चुलत भाऊ सोपान वाकळे आणि किशोर वाकळे यांच्याशी गेल्या पाच वर्षांपासून



जमिनीच्या जागेवरून वाद सुरू आहे. त्यांनी महानगरपालिकेत अतिक्रमणाची तक्रार केल्याने आरोपींनी फिर्यादीला मानसिक व शारीरिक त्रास देण्याच्या उद्देशाने हे कृत्य केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

सततच्या त्रासाला आणि हल्ल्याला कंटाळून अखेर संतोष वाकळे यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात धाव घेऊन लेखी तक्रार नोंदवली. या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांद्वारे गुन्हा दाखल केला. सदर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल गोपीनाथ गोरडे करत आहेत.

# आ. सुनील कर्जतकर यांचा सत्कार

## संजय कोठारींचे रुग्णसेवेचे कार्य कौतुकास्पद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवड झाल्याबद्दल नवनिर्वाचित आमदार सुनील कर्जतकर यांचा जामखेड येथील कोठारी परिवाराच्या निवासस्थानी यथोचित व भव्य सत्कार करण्यात आला. या सोहळ्याला विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावून नवविवाचित आमदारांना शुभेच्छा दिल्या. सत्कार समारंभाला उत्तर देताना आमदार सुनील कर्जतकर भावुक झाले.

ते म्हणाले, ''मी कोठारी परिवारातील सर्व सदस्यांना अत्यंत जवळून ओळखतो.समाजाप्रती असलेली त्यांची सततची धडपड आणि कार्य खरोखरच प्रेरणादायी आहे. विशेषतः सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांचे कार्य मी नेहमी वर्तमानपत्रांच्या माध्यमातून पाहत आलो आहे.अपघातग्रस्त किंवा जखमींना मदत करण्यासाठी ते स्वतः रुग्णवाहिकेत (ॲम्ब्युलन्स) जाऊन सेवा देतात, हे आजच्या काळात अत्यंत दुर्मिळ आणि कौतुकास्पद आहे.

या कौटुंबिक आणि स्नेहपूर्ण सोहळ्याला विजय कोठारी (प्रसिद्ध उद्योगपती), राजेंद्र कोठारी (ज्येष्ठ नेते, राष्ट्रवादी काँग्रेस), सुनील कोठारी (माजी सरपंच), संजय कोठारी व अजय कोठारी (सामाजिक कार्यकर्ते), मनोज कुलकर्णी (नगरसेवक)प्रा. धनंजय भोसले उपस्थित होते.

# भूमिगत केबल उकरून शुद्ध तांबे विक्रीची टोळी सक्रिय

## राज्यभर तांबे चोरीचे रॅकेट, अहिल्यानगरमध्ये गुन्हा दाखल



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : बीएसएनएलने लँडलाइन व ब्रॉडबॅन्ड सेवा पुरविण्यासाठी वीस वर्षापूर्वी भूमिगत केबल्स टाकल्या आहेत. या केबल सध्या वापरात नाहीत. मुख्य रस्त्याच्या बाजूला भूमिगत असलेल्या जाड केबल उकरून त्यातील शुद्ध तांबे काढून त्याची भंगारात विक्री केली जाते. ही टोळी राज्यभर सक्रिय असून, स्थानिक पोलिसांच्या मदतीने शुद्ध तांब्याची तस्करी सुरू आहे. यामुळे सरकारला लाखो रुपयांचा चुना लावला जात आहे.

छत्रपती संभाजीनगर, नाशिक आणि आता अहिल्यानगरमध्ये केबल चोरणारी टोळी दाखल झाली आहे. या टोळीने नगरमधील मुख्य रस्त्याच्या बाजूला जमिनीत गाडलेली बीएसएनएलची दीडशे मीटर केबल उकरली. ही केबल जाळून त्यांनी त्यातून ४० हजार रुपये किमतीचे तांबे काढले. ते पोलिसांनी जप्त केले.

राज्यातील इतर शहरांतही अशा घटना समोर येत आहेत. हे तांबे शुद्ध असल्याने त्याला भंगारात चांगला भाव मिळतो, असे सूत्रांनी सांगितले. सन १९९० ते २०१० या कालावधीत राज्यातील मोठ्या शहरांसह ग्रामीण भागात कॉपरची केबल जमिनीत गाडण्यात आली होती. या केबलवरून लँडलाइन व नेट कनेक्शन दिले जायचे. ही सेवा आता मोडकळीस आली आहे.

केबलमध्ये उच्च दर्जाचे तांबे असते. मुख्य रस्त्यांच्या बाजूला ही केबल गाडलेली आहे. ती जेसीबीच्या साहाय्याने काढली जाते. केबलचे आवरण जाळून त्यातील तांब्याची तार काढली जाते. तारीचे गठे तयार करून त्याची भंगारात विक्री केली जाते.

### रात्रीतून ९ ते १० लाखांची कमाई

साधारण ५० मीटर केबल उकरून ते जाळल्यास १०० ते २५० किलो शुद्ध तांबे निघते. हे तांबे भंगारात प्रतिकिलो ८५० ते १२०० रुपये दराने विकले जाते. चोरटे जेसीबीच्या साहाय्याने एका रात्रीत शंभर ते दीडशे मीटर केबल उकरतात. शहरापासून काही अंतरावर नेऊन जाळतात. त्यात बारीक तांब्याच्या तारा निघतात. रात्रीतून ७०० ते ८०० किलो तांबे काढून त्याची विक्री केली जाते. यातून चोरट्यांना ९ ते १० लाखांची कमाई होते.

# मंत्री विखे यांनी मानले मुख्यमंत्र्याचे आभार

## मराठा समाजातील विद्यार्थ्यांना मिळणार दिलासा

**जनता आवाज वृत्तसेवा**



**लोणी** : मराठा समाजाला इतर मागासवर्गीयांप्रमाणे शैक्षणिक सवलती व सोयीसुविधांचा लाभ देण्याबाबत महायुती सरकारने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे मराठा समाजातील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. घेतलेल्या निर्णयाबद्दल जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले असून, मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता महायुतीच्या निर्णयामुळे झाल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले.

दरम्यान, मराठा समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांच्या अंमलबजावणीसंदर्भात राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयांचे स्वागत करत मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे मनापासून आभार मानले आहेत. जरांगे पाटील म्हणाले की, मराठा समाजाच्या विविध मागण्यांची अंमलबजावणी करून समाजाला न्याय देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि प्रसाद लाड यांनी यासाठी सकारात्मक भूमिका घेतल्याचे त्यांनी नमूद केले.

''अंतरवाली सराटी येथे आंदोलना दरम्यान दिलेल्या आश्वासनांची पूर्तता महायुती सरकारने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरू केली आहे. मराठा समाजाला न्याय देण्याची भूमिका महायुती सरकारने नेहमीच सकारात्मक ठेवली असून, भविष्यातही सरकार समाजाला न्याय देण्यासाठी कटिबद्ध असेल.

मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या हितासाठी काढण्यात आलेल्या शासन निर्णयातील प्रत्येक योजनेचा लाभ त्यांना मिळावा, यासाठी प्रशासकीय स्तरावर तातडीने कार्यवाही करण्यात येईल. या महत्त्वपूर्ण निर्णयांबद्दल मंत्री विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत.

# जिल्हा पोलिस दलातील सुमारे ३०० कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या

## कुणाच्या चेहऱ्यावर आनंद, तर कुणाच्या डोळ्यांत अश्रू !



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : जिल्हा पोलीस दलातील चालू वर्षातील सुमारे ३०० पोलीस कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या गुरूवारी (४ जून) पोलीस मुख्यालयात पार पडल्या.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी आयोजित केलेल्या बदली दरबारात प्रत्येक कर्मचाऱ्याची भूमिका, गरज आणि पसंती जाणून घेत बदली प्रक्रिया राबविण्यात आली. या प्रक्रियेत काहींना मनासारखे पोलीस ठाणे मिळाल्याने आनंदाचे वातावरण होते, तर काहींना अपेक्षित ठिकाण न मिळाल्याने नाराजी आणि भावनिक क्षणही पाहायला मिळाले.

एका पोलीस ठाण्यात किंवा शाखेत सलग अथवा खंडित स्वरूपात पाच वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांकडून यापूर्वी तीन पसंतीच्या ठिकाणांसह अर्ज मागविण्यात आले होते. बदलीपात्र कर्मचाऱ्यांना गुरूवारी सकाळी पोलीस मुख्यालयाच्या स्थानिक गुन्हे शाखेत (एलसीबी) बदली मिळावी, अशी अनेक कर्मचाऱ्यांची इच्छा होती. अर्जातील पसंतीक्रमात एलसीबीचा समावेश असतानाही अधीक्षक सुदर्शन यांनी कोणालाही एलसीबीमध्ये बदली दिली नाही. त्यामुळे एलसीबीत जाण्याची अपेक्षा बाळगणाऱ्या कर्मचाऱ्यांचा हिरमोड झाला. काही पोलिसांनी विनंती बदल्यांसाठी अर्ज केले असले तरी त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. सध्या केवळ प्रशासकीय बदल्या करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

सकाळी साडेआठ वाजता सुरू झालेल्या या प्रक्रियेला पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्यासह अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि श्रीरामपूर विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे उपस्थित होते. बदली प्रक्रियेत प्रथम श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, सहायक फौजदार आणि पोलीस हवालदार यांच्या बदल्या करण्यात आल्या.

गुन्हे तपासाची जबाबदारी असलेल्या या अंमलदारांपैकी अनेक जण गेल्या अनेक वर्षांपासून नगर शहर व परिसरातील पोलीस ठाण्यांमध्ये कार्यरत होते. त्यामुळे जिल्ह्याच्या उत्तर व दक्षिण भागातील काही पोलीस ठाण्यांमध्ये तपास अंमलदारांची कमतरता निर्माण झाली होती. ही तूट भरून काढण्यासाठी काही बदल्या त्यांच्या पसंतीपेक्षा रिक्त जागांचा विचार करून करण्यात आल्या. मात्र, काही कर्मचाऱ्यांना अपेक्षित ठाणे न मिळाल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली.

# सीना पट्ट्यात जोरदार गारपीट

## अचानक झालेल्या पावसाने उडविली दाणादाण



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नगर तालुक्यातील सोलापूर रस्त्यालगतच्या सीना नदी पट्ट्यात शुक्रवारी दुपारनंतर अचानक वातावरणात मोठा बदल होऊन वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस आणि गारपीट झाली. बनपिंपरी, तरडगव्हाण, थिटे सांगवी, हातवळण परिसरातील अनेक गावांमध्ये अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली.

काही भागांत मोठ्या प्रमाणात गारा पडल्याने शेतकरी आणि नागरिकांची चांगलीच धावपळ उडाली.

शुक्रवारी दुपारनंतर आकाशात काळे ढग दाटून आले आणि काही वेळातच वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली. त्यानंतर अनेक ठिकाणी हरभऱ्याएवढ्या आकाराच्या गारा कोसळल्या.

गारपिटीमुळे परिसरातील रस्ते आणि शेतजमिनी पांढऱ्या शुभ्र झाल्याचे चित्र दिसून आले. वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटून पडल्या. काही गावांमध्ये वीजपुरवठाही काही काळासाठी खंडित झाला. अचानक झालेल्या या वादळी गारपिटीमुळे जनजीवन विस्कळीत झाले होते.

नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी आश्रय घेतला, तर शेतकऱ्यांनी पिके वाचविण्यासाठी शेताकडे धाव घेतल्याचे दिसून आले. गारपीट आणि जोरदार वाऱ्यामुळे शेती पिकांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषतः उन्हाळी भाजीपाला, मका, कांदा, फळबागा व इतर पिकांना फटका बसण्याची शक्यता आहे. अनेक शेतकऱ्यांनी

### महसूल व कृषी विभाग लक्ष ठेवून

महसूल व कृषी विभागाने परिस्थितीवर लक्ष ठेवले असून नुकसानग्रस्त भागांचा आढावा घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे. सिना पट्ट्यातील शेतकरी मात्र या अवकाळी संकटामुळे चिंतेत असून पुढील काही दिवस हवामान स्थिर राहावे, अशी अपेक्षा व्यक्त करत आहेत.

# संपादकीय

## नवे राजकीय समिकरण

गेल्या काही दशकांमध्ये राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांच्या आघाड्या, त्यातील बदलती निष्ठा आणि सत्तासमीकरणांनुसार होणारी राजकीय पुनर्रचना यामुळे हे विधान वारंवार खरे ठरले आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस आणि द्रमुक यांच्यातील कथित दुरावा तसेच भविष्यात द्रमुकने तटस्थ भूमिका स्वीकारण्याची किंवा अगदी भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडे (एनडीए) झुकण्याची शक्यता याविषयी चर्चा सुरू झाली आहे. या घडामोडी केवळ तामिळनाडूपुरत्या मर्यादित नाहीत, तर त्याचे परिणाम राष्ट्रीय राजकारणावरही होऊ शकतात. काँग्रेस आणि द्रमुक यांचे संबंध हे स्वतंत्र भारताच्या राजकीय इतिहासातील सर्वात दीर्घकालीन आणि प्रभावी राजकीय सहकार्यांपैकी एक मानले जात. द्रविड चळवळीच्या राजकीय वारशातून उदयाला आलेल्या द्रमुकने अनेकदा केंद्रातील काँग्रेसविरोधी भूमिका घेतली असली, तरी काळानुसार दोन्ही पक्षांमध्ये सहकार्याचे नवे अध्याय लिहिले गेले. विशेषतः १९८० नंतर आणि नंतरच्या संयुक्त पुरोगामी आघाडीच्या (यूपीए) काळात द्रमुक हा काँग्रेसचा महत्त्वाचा सहयोगी बनला. केंद्रात सरकार स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेल्या संख्याबळात द्रमुकचे योगदान निर्णायक ठरत असे; मात्र राजकीय वास्तव सतत बदलत असते. आघाडीतील एखाद्या पक्षामध्ये स्वतःचा सन्मान, राजकीय वजन आणि प्रादेशिक हितसंबंध यांचा योग्य सन्मान होत नसल्याची भावना निर्माण झाली, तर तणाव अपरिहार्य ठरतो. द्रमुकच्या बाबतीतही अशीच परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसते. विधानसभेच्या निवडणुकीत द्रमुकचा मोठा पराभव झाला. अशा वेळी अस्थिरतेच्या काळात निवडून आलेल्या पाच आमदारांच्या जीवावर सत्तेत सहभागी होता येत असल्यास संधी कशाला सोडायची, अशी काँग्रेसची मानसिकता झाली असल्यास नवल नाही. स्थानिक नेत्यांचे ऐकले नसते तर पाचही आमदार सत्तेबरोबर गेले असते आणि काँग्रेसवर नामुष्की ओढवली असती. या पार्श्वभूमीवर काँग्रेसने 'टीव्हीके' या पक्षाबरोबर सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे संतप्त झालेल्या द्रमुकने सहा दशकांपासून असलेली काँग्रेसबरोबरची युती तोडली. सध्या या पक्षाने तटस्थतेची भूमिका घेतली असली, तरी अण्णाद्रमुक या मित्रपक्षात पडलेली फूट पाहता भाजप आणि द्रमुक एकत्र आले, तर आश्चर्य वाटायला नको. दुसरीकडे, भाजपच्या दृष्टीने पाहता दक्षिण भारतातील विस्तार हा दीर्घकालीन राजकीय उद्देश राहिला आहे. उत्तर आणि पश्चिम भारतात मजबूत पाया निर्माण केल्यानंतर भाजपने दक्षिणेकडे लक्ष केंद्रित केले आहे. कर्नाटकमध्ये सत्ता मिळवणे, तेलंगणामध्ये मताधिक्य वाढवणे आणि केरळ तसेच तामिळनाडूमध्ये संघटन विस्तार करणे या दिशेने पक्ष सातत्याने प्रयत्न करत आहे; मात्र तामिळनाडूमध्ये भाजपला अद्याप स्वतंत्रपणे मोठे यश मिळालेले नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे तेथील द्रविड राजकारणाची खोलवर रुजलेली परंपरा. अशा परिस्थितीत द्रमुकसारख्या प्रभावशाली प्रादेशिक पक्षाशी सौहार्दपूर्ण संबंध प्रस्थापित करणे भाजपसाठी फायदेशीर ठरू शकते. अर्थात, द्रमुक आणि भाजप यांची वैचारिक पार्श्वभूमी भिन्न आहे.

द्रविड अस्मिता, भाषिक स्वायत्तता, संघराज्यवाद आणि सामाजिक न्याय या मुद्द्यांवर द्रमुकची भूमिका पारंपरिकरीत्या भाजपपेक्षा वेगळी राहिली आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांमध्ये औपचारिक आघाडी होईल, असे म्हणणे धाडसाचे ठरेल; तरीही भारतीय राजकारणात वैचारिक भिन्नतेवर राजकीय व्यवहारवाद अनेकदा मात करताना दिसला आहे. तामिळनाडूतील दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे अण्णाद्रमुकची सध्याची अवस्था. एके काळी द्रमुकला थेट आणि सक्षम आव्हान देणारा हा पक्ष गेल्या काही वर्षांमध्ये अंतर्गत संघर्ष, नेतृत्वावरील वाद आणि संघटनात्मक कमकुवतपणामुळे अडचणीत सापडला आहे. पक्षातील गटबाजी आणि फुटीमुळे त्याची राजकीय ताकद कमी झाल्याची धारणा निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय स्पर्धेचे स्वरूप बदलत आहे. अण्णाद्रमुक कमकुवत होत असताना भाजप स्वतःची स्वतंत्र ताकद वाढवण्याचा प्रयत्न करत आहे; मात्र तामिळनाडूसारख्या राज्यात प्रादेशिक पक्षांच्या प्रभावाशिवाय मोठी राजकीय झेप घेणे कठीण आहे. त्यामुळे भाजपला भविष्यात नव्या सहयोगींची गरज भासू शकते. द्रमुक आणि भाजप यांच्यातील संवाद वाढल्यास किंवा विशिष्ट मुद्द्यांवर सहकार्याची भूमिका निर्माण झाल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण राहणार नाही. राजकारणात 'शत्रूचा शत्रू तो मित्र' हे समीकरण अनेकदा दिसून येते. काँग्रेसने आपल्या राजकीय योगदानाचा पुरेसा सन्मान न केल्यास राजकीय संदेश देण्यासाठी द्रमुक पर्यायी मार्गांचा विचार करू शकतो. तटस्थता, विषयनिहाय सहकार्य किंवा भविष्यातील संभाव्य आघाडी हे त्यातील पर्याय असू शकतात. अशा निर्णयामागे केवळ भावना नसून राजकीय गणित आणि दीर्घकालीन हितसंबंध महत्त्वाचे असतील; मात्र द्रमुकसमोरही काही आव्हाने आहेत. तामिळनाडूतील त्याचा मुख्य मतदारवर्ग सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता आणि प्रादेशिक स्वाभिमान या मुद्द्यांशी जोडलेला आहे. भाजपशी अतिजवळीक निर्माण झाल्यास या मतदारवर्गात संभ्रम किंवा नाराजी निर्माण होऊ शकते. त्यामुळे कोणताही निर्णय घेताना द्रमुकला आपल्या सामाजिक आधाररचनेचाही विचार करावा लागेल. पक्ष नेतृत्वासाठी हा संतुलनाचा कस लागणारा काळ असेल. काँग्रेससाठीही हा इशारा मानला पाहिजे. राष्ट्रीय स्तरावर प्रादेशिक पक्षांच्या पाठिंब्याशिवाय प्रभावी पर्याय उभा करणे कठीण आहे. विविध राज्यांमधील प्रादेशिक पक्ष त्यांच्या प्रदेशातील जनमताचे प्रतिनिधित्व करतात. त्यामुळे त्यांच्याशी सन्मानपूर्वक आणि समन्वयाने संबंध ठेवणे काँग्रेससाठी महत्वाचे आहे. सहयोगी पक्षांच्या अपेक्षा, स्थानिक वास्तव आणि नेतृत्वाच्या आकांक्षा यांचा योग्य विचार न झाल्यास आघाडीची एकजूट कमकुवत होऊ शकते. याउलट, भाजप या परिस्थितीकडे संधी म्हणून पाहू शकतो. विरोधी आघाड्यांमधील मतभेद वाढवणे, नाराज पक्षांशी संवाद ठेवणे आणि राष्ट्रीय राजकारणात स्वतःचे संख्याबळ सुरक्षित ठेवणे ही कोणत्याही सत्ताधारी पक्षाची नैसर्गिक रणनीती असते. द्रमुकने थेट 'एनडीए'मध्ये प्रवेश केला नाही, तरी त्याची मवाळ भूमिका किंवा तटस्थतादेखील भाजपसाठी लाभदायक ठरू शकते. आगामी काळात संसदेतील महत्त्वाची विधेयके, राष्ट्रपती किंवा उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुका तसेच राष्ट्रीय स्तरावरील राजकीय घडामोडी या संदर्भात द्रमुकची भूमिका विशेष लक्षवेधी ठरेल.

**कृषकांच्या हक्कांसाठी आयुष्य वेचलेला लढवय्या नेता**

# गोदारत्न गोविंदराव आदिक

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि कृषी क्षेत्राच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांचे कार्य केवळ एका कालखंडापुरते मर्यादित राहत नाही. ती विचारांची चळवळ बनतात, संघर्षाची प्रेरणा बनतात आणि पिढ्यानपिढ्या मार्गदर्शन करणारा दीपस्तंभ ठरतात. माजी खासदार गोविंदरावजी आदिक हे अशाच दुर्मीळ नेतृत्वांपैकी एक होते. त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे कार्य आठवताना महाराष्ट्राच्या कृषी समाजासाठी त्यांनी उभारलेले योगदान नव्याने अधोरेखित होते.

गोदावरीच्या काठी वसलेल्या खानापूर या छोट्याशा गावात ४ जानेवारी १९३९ रोजी जन्मलेल्या गोविंदराव आदिक यांनी संघर्षातून स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडविले. कायद्याचे सखोल ज्ञान, सामाजिक प्रश्नांची जाण, शेतकरी व कामगारांच्या वेदनांची संवेदनशील जाणीव आणि उत्कृष्ट संघटन कौशल्य यांच्या बळावर त्यांनी राज्याच्या राजकारणात स्वतःचा वेगळा ठसा उमटविला.

त्यांच्या सार्वजनिक जीवनाचा प्रवास हा केवळ सत्तेच्या शिखरापर्यंत पोहोचण्याचा नव्हता, तर सामान्य माणसाच्या प्रश्नांसाठी सातत्याने झगडण्याचा होता. जिल्हा न्यायालय स्थापनेपासून समाजसेवा मंडळ, मुळा-प्रवरा वीज सोसायटी, जिल्हा महामंडळ अशा अनेक संस्थांच्या उभारणीत त्यांनी पुढाकार घेतला. १९७० मध्ये श्रीरामपूर मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आल्यानंतर त्यांच्या राजकीय कारकिर्दीला नवे वळण मिळाले.

महाराष्ट्राच्या पुरोगामी राजकारणात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. पाटबंधारे, लाभक्षेत्र विकास, विधी व न्याय, माहिती आणि जनसंपर्क यांसारख्या महत्त्वाच्या खात्यांचे कॅबिनेट मंत्री म्हणून काम करताना त्यांनी विकासाभिमुख निर्णय घेतले. प्रशासनावर पकड आणि लोकांशी असलेला थेट संवाद यामुळे ते सर्वसामान्यांमध्ये लोकप्रिय ठरले.

**प्रासंगिक**

**- डॉ. संगिता फासाटे-कटारे**
**मोबा. ९५१८९००५७८**

गोविंदराव आदिक यांची खरी ओळख मात्र शेतकऱ्यांचे नेते हीच राहिली. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील दारिद्र्य, नापिकी, बाजारातील अस्थिरता, सिंचनाचा अभाव आणि कर्जबाजारीपणामुळे होणारी शेतकऱ्यांची होरपळ त्यांनी जवळून अनुभवली होती. त्यामुळेच त्यांनी केवळ समस्या मांडण्यापेक्षा त्यावरील



शाश्वत उपाययोजनांचा शोध घेतला.

सन २००६ मध्ये त्यांनी महाराष्ट्र कृषक समाजाची स्थापना केली. शेतकरी, अर्थतज्ज्ञ, संशोधक, प्रशासकीय अधिकारी आणि समाजसेवक यांच्याशी सखोल चर्चा करून त्यांनी ग्रामीण विकासाचा व्यापक आराखडा तयार केला. जमीन, पाणी, हवामान, बियाणे, खते, औषधे, अवजारे, मजूर, साठवण, प्रक्रिया, वाहतूक, पतपुरवठा आणि बाजारभाव अशा शेतीशी निगडित महत्त्वाच्या विषयांचा अभ्यास करून त्यांनी अकरा कलमी शेतकरी सनद तयार केली.

ही सनद केवळ मागण्यांचे निवेदन नव्हते, तर ग्रामीण परिवर्तनाचा दस्तावेज होता. शेतकऱ्यांचे प्रश्न गावपातळीपासून दिल्लीपर्यंत पोहोचवण्याचे काम त्यांनी सातत्याने केले. आजही कृषी धोरणांवर चर्चा होताना त्यांच्या विचारांची प्रासंगिकता जाणवते.

गोविंदराव आदिक यांचे व्यक्तिमत्त्व केवळ राजकारणापुरते मर्यादित नव्हते. साहित्य, कला, संगीत, नाट्य, चित्रपट, विज्ञान आणि क्रीडा या क्षेत्रातील मान्यवरांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. उत्कृष्ट वक्तृत्व, हिंदी-इंग्रजी भाषांवरील प्रभुत्व, शेरोशायरीची आवड आणि रसिक वृत्ती यामुळे ते एक परिपूर्ण व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात.

आंतरराष्ट्रीय पातळीवरही त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले. संयुक्त राष्ट्र संघात भारतीय संसदेचे प्रतिनिधी म्हणून सहभागी होत त्यांनी आंतरराष्ट्रीय दहशतवादासारख्या महत्त्वाच्या विषयांवर देशाची भूमिका प्रभावीपणे मांडली. त्यांचे विचारमंथन आणि अभ्यासू वृत्ती यामुळे त्यांना सर्वपक्षीय आदर मिळाला.

राजकीय पदे, मंत्रीपदे, आमदारकी, खासदारकी, महामंडळाचे अध्यक्षपद किंवा विविध संघटनांचे नेतृत्व ही त्यांच्या कारकिर्दीची बाह्य रूपे होती; परंतु त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गाभा होता तो समाजासाठी जगण्याचा. ''स्वतःसाठी जगता जगता दुसऱ्यासाठीही जगले पाहिजे'' हा त्यांचा जीवनमंत्र होता. तो त्यांनी केवळ शब्दांत नव्हे तर कृतीतून जगला.

७ जून २०१५ रोजी हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. महाराष्ट्राच्या राजकीय आणि कृषी क्षेत्रातील एक महत्त्वाचा आवाज हरपला. शेतकरी, कष्टकरी, ऊसतोड कामगार आणि ग्रामीण समाजाला आपला आधारवड गमावल्याची भावना त्या दिवशी झाली. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांची आठवण केवळ भावनिक होत नाही, तर विचार करायलाही भाग पाडते. शेतकरी आत्महत्या, बाजारपेठेतील अस्थिरता, हवामान बदलाची संकटे आणि ग्रामीण भागातील वाढती आव्हाने पाहताना गोविंदराव आदिक यांसारख्या दूरदृष्टीच्या नेतृत्वाची उणीव प्रकर्षाने जाणवते.

त्यांचे विचार, त्यांची शेतकरी सनद, त्यांची संघर्षशीलता आणि समाजहिताची बांधिलकी हीच त्यांची खरी स्मारके आहेत. त्यांच्या वारशाचे जतन करण्याचे कार्य त्यांचे सुपुत्र अविनाश आदिक आणि कन्या अनुराधा आदिक विविध सामाजिक व कृषक उपक्रमांतून करत आहेत, ही बाबही समाधान देणारी आहे.

''मरावे परी कीर्तिरूपे उरावे'' या उक्तीचा प्रत्यय गोविंदराव आदिक यांच्या जीवनाकडे पाहताना येतो. व्यक्ती निघून जातात, पण त्यांचे विचार आणि कार्य समाजाच्या स्मृतीत कायम राहतात. गोदारत्न, कृषकांचे कैवारी आणि सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते माजी खासदार गोविंदरावजी आदिक यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन.

# संत पंढरीत आज सामूहिक धोंडे जेवण

## परंपरा, अध्यात्म आणि सामाजिक ऐक्याचा अनोखा संगम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : धार्मिक, आध्यात्मिक आणि सामाजिक ऐक्याची परंपरा जपणाऱ्या पिंपळगाव वाघा (ता. पारनेर) येथील संत पंढरीत रविवारी (दि. ७) सामूहिक धोंडे जेवणाचा भव्य कार्यक्रम उत्साहात आयोजित करण्यात आला आहे. राज्यभरातील भाविक, वारकरी, समाजबांधव तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत हा उपक्रम पार पडणार असल्याची माहिती हभप राजेश्वरानंद महाराज कुऱ्हे यांनी दिली.

कृष्णकृपांकित प्रसिद्ध भागवताचार्य हभप डॉ. विकासानंद महाराज मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात ग्रामस्थांसह महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक आणि बालकांचा मोठ्या संख्येने सहभाग अपेक्षित आहे. संत पंढरीतील सेवेकरी भक्त आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

ग्रामीण खाद्यसंस्कृतीचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या धोंडे जेवणाला विशेष सांस्कृतिक महत्त्व आहे. ज्वारी, बाजरी किंवा गव्हाच्या पिठापासून तयार केलेले धोंडे, त्यासोबत पुरणपोळी, गुळवणी, भात, आमटी, भजे आणि कुरडई यांसारख्या पारंपरिक पदार्थांची मेजवानी भाविकांना अनुभवता येणार आहे. या माध्यमातून जुन्या खाद्यपरंपरा आणि ग्रामीण जीवनशैलीची आठवण नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न असल्याचे हभप श्यामसुंदर महाराज नाणेकर यांनी सांगितले.

दरम्यान, पिंपळगाव वाघा येथे उभारण्यात येत असलेल्या भव्य 'संत पंढरी' प्रकल्पाबाबतही यावेळी सविस्तर माहिती दिली जाणार आहे. अध्यात्म, संस्कार आणि समाजप्रबोधन यांचे केंद्र म्हणून विकसित होत असलेल्या या प्रकल्पाच्या पुढील वाटचालीवर चर्चा होणार आहे.

सामूहिक धोंडे जेवणासारख्या उपक्रमांमुळे सामाजिक सलोखा, परस्पर सहकार्य आणि धार्मिक एकोपा वृद्धिंगत होतो. कार्यक्रमात महिलांकडून स्वयंपाकाची जबाबदारी सांभाळली जाणार असून युवक नियोजन, व्यवस्था आणि पाहुण्यांच्या स्वागतासाठी सक्रिय भूमिका बजावणार आहेत. या कार्यक्रमास सर्व क्षेत्रांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन हभप दत्तात्रय महाराज कारले यांनी केले आहे.

पान १ वरून

## रायगडावर शिवसंस्कृतीचा जागर

तर शिवसागर आहे, असे म्हटले. रायगडावर मर्यादित सुविधा असतानाही हजारो शिवभक्त अनेक दिवसांपासून मुक्काम करून या सोहळ्यासाठी उपस्थित राहतात, याबद्दल त्यांनी विशेष गौरव केला. राहण्याची, जेवणाची आणि इतर सुविधांची कमतरता असूनही शिवभक्त मोठ्या श्रद्धेने रायगडावर येतात, हेच महाराजांविषयीचे प्रेम आणि निष्ठा दर्शवते, असे त्यांनी नमूद केले.

संभाजीराजे पुढे म्हणाले की, गेल्या काही दिवसांपासून गडावर मुक्काम करणाऱ्या शिवभक्तांचे समर्पण पाहून ते स्वतःही भावूक झाले आहेत. रात्रीची व्यवस्था, दैनंदिन गरजा आणि अनेक अडचणी असूनही हजारो लोक फक्त छत्रपती शिवाजी महाराजांना वंदन करण्यासाठी येथे दाखल झाले आहेत. ३०० वर्षांहून अधिक काळ लोटल्यानंतरही एखाद्या राजासाठी अशी भावना आणि श्रद्धा कायम राहणे ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. आपण महाराजांचे रक्ताचे आणि विचारांचे वारसदार आहोतच, पण या शिवभक्तांनाही वंदन करण्यासाठी आपण येथे आलो असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राज्याभिषेक सोहळ्याचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करताना संभाजीराजेंनी सांगितले की, हा दिवस केवळ एका राजाच्या राज्याभिषेकाचा नव्हता, तर स्वराज्याच्या नव्या पर्वाचा प्रारंभ होता. ज्या ठिकाणी आज मेघडंबरीत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आहे, त्याच ठिकाणी महाराजांना छत्रपती पदाचा मान मिळाला होता.

अनेक सत्ताधीशांना आणि गुलामगिरीच्या जोखडाला आव्हान देत महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. त्यामुळे हा दिवस इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरला. राज्याभिषेकानंतर महाराजांनी नव्या शकाची सुरुवात केली आणि स्वराज्याला स्वतंत्र ओळख दिली, याची आठवण त्यांनी करून दिली.

## देवस्थानांना मिळणार जमिनींचे हक्क

घेतला आहे. देवस्थाने, हिंदुत्ववादी संघटना आणि संबंधित घटकांमध्ये या कायद्याबाबत निर्माण झालेला संभ्रम दूर करणे आवश्यक असल्याचेही बावनकुळे यांनी सांगितले. त्यामुळे प्रत्येक आक्षेपाची सखोल सुनावणी करूनच पुढील निर्णय घेतला जाणार आहे.

नव्या कायद्याच्या तयारीसाठी महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीत २ विभागीय आयुक्त, २ जिल्हाधिकारी, ३ उपसचिव आणि १५ देवस्थान प्रतिनिधींचा समावेश असेल. देवस्थानांसाठी न्यायालयात लढा देणाऱ्या कायदेतज्ज्ञांनाही या समितीवर स्थान दिले जाणार आहे. १५ ऑगस्टपर्यंत प्राप्त सूचना आणि हरकतींवर सुनावणी केली जाईल, तर १५ सप्टेंबरपर्यंत नव्या कायद्याचा मसुदा तयार करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले.

## राज्यात हमीभावाने कांदा खरेदीला मंजुरी

कांदा खरेदी कृषी उत्पन्न बाजार समितीमधून होणार आहे.

नाफेड व एनसीसीएफकडून बाजार समिती आवारातील खरेदीसाठीचे बाजार शुल्क माफ होणार असून सरकारी कांदा खरेदीसाठी असलेल्या जाचक अटी आणि शर्तींमध्ये सुधारणा झाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. त्यामुळे बाजारभाव स्थिर राहण्यास मदत होणार आहे.

## राज्य सरकार अत्यंत असंवेदनशील

घेण्यात आला. प्रचंड घोडेबाजार पुणे विधान परिषद निवडणुकीसाठी होणार अशी चर्चा होती त्यामुळे आम्ही या निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला.

खा. सुळे म्हणाल्या की, राज्यात विधान परिषदेच्या ८ जागांवर मविआच्या उमेदवारांनी माघार घेतली आहे. त्यामध्ये काही जण काँग्रेसचे सुद्धज्ञ आहेत ना. घोडेबाजार होऊ नये म्हणून आम्ही पुण्याचा निर्णय घेतला. सरपंच निवडीपासून ते थेट लोकसभा निवडणुकीपर्यंत सर्वच ठिकाणी गुप्त मतदानाऐवजी हात वर करून जाहीर मतदान पद्धत लागू झाली पाहिजे, यासाठी आपण संसदेत बिल आले तर त्यांचे स्वागत करू.

लोकसभा आणि विधानसभेला आम्ही सत्ताधाऱ्यांच्या विरोधात ताकदीने लढणारच आहोत. सत्ताधाऱ्यांनी पैशाच्या जीवावर निवडणूक लढवू नये आणि यंत्रणेची भीती सुद्धा दाखवू नये. हा देश लोकशाही पद्धतीने चालला पाहिजे त्यासाठी आम्ही प्रयत्न करू. विधान परिषद निवडणुकीत काहीच रंगत नव्हती. मला वाटले नव्हते की इतक्या मोठ्या प्रमाणात घोडेबाजार होईल.

खा. सुळे म्हणाल्या की, पारदर्शकपणे निवडणूक झाल्यावर त्या निवडणुकीत मजा येते. विधान परिषदेच्या निवडणुकीत काहीच मजा नसते. राज्यसभेची निवडणूक झाली ती बिनविरोध झाली कारण हा सर्व गोष्टी संख्याबळावर आधारित असतात. पुण्यात आमच्याकडे दीडशे मते होती. कोण काय बोलते यावर आम्ही काय बोलणार नाही. शेतकरी कर्जमाफीसाठी रोहित पवारांनी अन्नत्याग करण्यापेक्षा वाटप होऊ द्यावे त्यानंतर आपण काही तरी वेगळी भूमिका घेऊन सरकारला जनतेच्या हिताची भूमिका घेण्यास भाग पाडू पण रोहित पवारांनी अन्नत्याग करू नये.

खा. सुळे म्हणाल्या की, इंडिया आघाडीची ८ तारखेला बैठक आहे त्यासाठी काँग्रेसकडून आम्हाला निमंत्रण देण्यात आले आहे. मी स्वत: दिल्लीमध्ये या बैठकीसाठी जाणार आहे. सशक्त लोकशाहीमध्ये कोणीही पक्ष स्थापन करू शकते, त्यामुळे कॉकरोच पार्टीच्या अभिजीत दिपके यांना आमच्या शुभेच्छा आहे.

पान १ वरून

## सभापतींच्या धोरणांविरोधात सदस्य एकवटले

या उद्देशातून आमच्यावर जबाबदारी दिली होती. त्यामुळे शेतकऱ्यांची कामधेनू असलेल्या संस्थेचे हित जपणे हे आमचे प्राथमिक कर्तव्य आहे. मात्र काही महिन्यांपासून बाजार समितीमध्ये उत्पन्नाचा विचार न करता मोठ्या प्रमाणावर अनावश्यक खर्च करण्यात येत असून आर्थिक शिस्त पूर्णपणे ढासळत चालली आहे.

सभापतींच्या सुरु असलेल्या सध्याच्या अनागोंदी कारभारामुळे संस्था आर्थिक संकटाच्या उंबरठ्यावर पोहोचण्याची भीती निर्माण झाली आहे. या पापाचे भागीदार होण्याची आमची अजिबात इच्छा नाही. आम्हाला पदापेक्षा शेतकऱ्यांचे हित आणि संस्थेची प्रतिष्ठा महत्वाची आहे.

शेतकऱ्यांच्या मालाला वाजवी दर देणारी हक्काची बाजारपेठ म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीकडे पाहिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी अधिकच्या चांगल्या उपाय योजना कशा पद्धतीने राबविल्या पाहिजे याचा प्रामुख्याने विचार होणे गरजेचे असताना शेतकऱ्यांच्या हितासाठी आवश्यक असलेल्या योजनांवर खर्च करण्याऐवजी गरज नसलेल्या बाबींवर नको त्या ठिकाणी निधी खर्च केला जात आहे. त्यामुळे संस्थेच्या आर्थिक शिस्तीला बाधा पोहोचत असून संस्थेची आर्थिक घडी विस्कटण्याचा धोका निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांच्या आणि बाजार समितीच्या भवितव्याशी खेळण्याचा हा प्रकार असून यामध्ये सुधारणा होईल, अशी आम्हाला अपेक्षा होती.

मात्र हा प्रकार थांबण्याऐवजी यामध्ये वाढ होत चालली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आणि बाजार समितीच्या भवितव्याशी खेळणाऱ्या या कारभाराला आम्ही समर्थन देऊ शकत नाही. सभापती यांच्या कारभाराविरोधात विद्यमान उपसभापतींसह सदस्यांनी घेतलेल्या या भूमिकेमुळे बाजार समितीत मोठी खळबळ उडाली असून शेतकरी व व्यापारी वर्गातही या निर्णयाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

## आमदारांनीच पकडला दारूचा अड्डा

मात्र आमदार तेथून गेल्यानंतर ती दुचाकी तेथून गायब झाली. संबंधित दारू विक्रेत्यावर दुचाकी तेथून गायब झाली. संबंधित दारू विक्रेत्यावर यापूर्वीही दोन गुन्हे दाखल आहेत.

या ठिकाणी बऱ्याच दिवसांपासून दारूविक्री सुरू होती. बीट हवालदाराचे अभय असल्याशिवाय दारू विक्रेता हा धंदा करू शकत नाही. त्यामुळे संबंधित बीट हवालदारावरही कारवाई करण्याची मागणी आपण करणार असल्याचे आमदार लहामटे यांनी सांगितले. पोलिस पाटीलही गावाकडे लक्ष ठेवीत नसेल तर तो तेथे कामावर राहता कामा नये असे ते म्हणाले. तसेच ज्यांच्या घरात ही विक्री सुरू होती त्या घरमालकाच्या सर्व शासकीय लाभ बंद करण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

# श्रीगोंद्यात खंडणीसाठी तलवारीचा धाक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : खंडणी उकळण्यासाठी तलवारीचा धाक दाखवत घरावर हल्ला, महिलेला मारहाण आणि जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी श्रीगोंद्यातील सराईत गुन्हेगारांच्या टोळीवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोका) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी आठ आरोपींविरुद्ध मोका कायद्याची मंजुरी दिली असून जिल्ह्यातील संघटित गुन्हेगारीविरोधातील ही महत्त्वाची कारवाई मानली जात आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २७ फेब्रुवारी २०२६ रोजी काष्टी (ता. श्रीगोंदा) येथील चौधरी मळा परिसरात आरोपींनी चारचाकी व दुचाकी वाहनांवरून येत फिर्यादीच्या घरावर दगडफेक केली. टोळी प्रमुख सुभाष कोंडीबा चौधरी याने फिर्यादीवर तलवारीने वार करून त्यांचा खून करण्याचा प्रयत्न केला. मात्र फिर्यादीने वार चुकविल्याने अनर्थ टळला. याचवेळी आरोपी वैभव सुभाष चौधरी व त्याच्या साथीदारांनी घरात जबरदस्तीने प्रवेश करून फिर्यादीच्या आईला मारहाण केली. तसेच, ''या ठिकाणी जिवंत राहायचे असेल तर दरमहा १५ हजार रुपये द्यावे लागतील,'' अशी धमकी देत खंडणीची मागणी केल्याचा आरोप आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत हि १) विमल रामदास सोनवणे, २) वैशाली राहुल गजभिव, ३) मिलिंद रामदास सोनवणे, ४) सनिकेत रामदास सोनवणे, सर्व रा. छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र यांच्या मालकीची व कब्जेवहीवाटीची आहे. सदर मालकांनी सदर मिळकत निजोखमी, बिनबोजाची, निर्वेध असुन त्यांना सदर मिळकत विकण्याचा संपुर्ण हक्क व अधिकार आहे व तसा भरवसा त्यांनी आमचे आशिलास दिलेला असुन त्यावर विसंबुन आमचे आशिलाने त्यांचे समवेत सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार निश्चित केलेला आहे. सबब परिशिष्ठात नमुद मिळकती बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसांच्या आत आमचेशी समक्ष संपर्क करून त्याबाबत कागदोपत्री पुराव्यानिशी आमची खात्री करून दयावी मात्र मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास आमचे आशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत, तकार चालणार नाही व ती आमचे आशिलावर देखील बंधनकारक राहणार नाही,

-: परिशिष्टः-

मिळकतीचे वर्णन : डिस्ट्रीक अहिल्यानगर, सब डिस्ट्रीक व तालुके श्रीरामपुर पैकी पंचायत समिती श्रीरामपुर मधील मौजे श्रीरामपुर येथील व श्रीरामपुर नगरपालिका व सिटी सर्व्हे हददीतील, टी.पी. स्किम नंबर ५ (प्रा) अंतिम भुखंड क्रमांक ४९३ पैकी, निवासी बखळ प्लॉट जागा मिळकत याचा सर्व्हे नं १२२ पैकी, यांसी सिटी सव्र्हे नंबर २१५४ पैकी, फायनल प्लॉट नंबर ४९३ पैकी, क्षेत्र ८५ चौरस मिटर यांसी आकार हिस्सेराशी प्रमाणे, यांसी लांबी दक्षिण उत्तर ३६ फुट ६ इंच चे मीटर ११.१५. यांसी रूंदी पुर्व पश्चिम २५ फुट चे मीटर ७.७२, सदर प्लॉट मध्ये जाणे येणेसाठी प्लॉटचे दक्षिण व पश्चिम बाजुने असलेल्या रस्त्याने वहीवाट करण्याचे हवकासह, यांसी चतुः सिमा पुर्वेस सौ विदया चांगदेव जाधव यांचा प्लॉट, दक्षिणेस : अंतर्गत रस्ता, पश्चिमेस अंतर्गत रस्ता, उत्तरेस अतुल पुंडलिक मोरगे व इतर यांची राहीलेली मिळकत, येणे प्रमाणे चतुः सिमा पुर्वक बखळ प्लॉट मिळकत ती मधील तदंगभुत वस्तु व हक्कासह काहीएक राखुन न ठेवता हि नोटीस दिली असे.

दिनांक ०६/०६/२०२६

खरेदी घेणा-या करीता व तर्फे

**ॲड. सुशिल. अ. पांडे**

**ॲड, वैभव व्ही गुगळे**

**ॲड. तुषार बी. आदिक** (मो. ९८५०१८१२२०)

# ग्रामीण भागातील मुलींचे यश प्रेरणादायी

## आ. काशिनाथ दाते; वडगाव सावताळच्या कन्यांचा गौरव



*ग्रामीण भागातील मुली जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर आज विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करत आहेत. काजल खामकर आणि सुप्रिया आंधळे यांची मुंबई पोलीस दलात झालेली निवड ही केवळ त्यांच्या कुटुंबासाठी नव्हे तर संपूर्ण पारनेर तालुक्यासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील इतर विद्यार्थिनींनाही मोठी प्रेरणा मिळणार असून त्यांनी प्रामाणिकपणे कर्तव्य बजावत समाजसेवेचा आदर्श निर्माण करावा.*

**आ. काशिनाथ दाते.**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : ग्रामीण भागातील मुलींचे यश प्रेरणादायी असल्याचे गौरवोद्गार आ. काशिनाथ दाते यांनी काढले. वडगाव सावताळ येथील काजल मच्छिंद्र खामकर व सुप्रिया अशोक आंधळे यांची मुंबई पोलीस खात्यात कॉन्स्टेबल पदावर नियुक्ती झाल्याबद्दल आ. काशिनाथ दाते यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करून गौरव करण्यात आला.

या सत्कार समारंभास राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंत चेडे, तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, आर. एस. कापसे, देवराम मगर, सुभाषराव सासवडे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका महिला अध्यक्षा सुषमाताई रावडे, भाऊसाहेब खामकर , दत्तात्रय सरोदे, प्रदीप रोकडे, माजी सरपंच बाबासाहेब शिंदे, कैलास खामकर, मंगेश खामकर, तुषार खामकर, विठ्ठल खामकर, शैलेश जांभळकर, शुभम आंधळे, विठ्ठल बर्डे उपस्थित होते.

सत्कारानंतर उपस्थित मान्यवरांनी दोन्ही युवतींचे अभिनंदन करत त्यांच्या भावी सेवेसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला. ग्रामीण भागातील मुलींनी कठोर परिश्रम, चिकाटी आणि ध्येयाप्रती असलेली निष्ठा यांच्या बळावर मिळविलेले हे यश निश्चितच नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# ..तर पोलिस पाटलांवरही होणार कारवाई

## अवैध दारूविरोधात आता ऑपरेशन क्लीन सुरू होणार



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : तालुक्यात वाढत्या अवैध दारू व्यवसायावर आता प्रशासनाने कडक भूमिका घेतली असून, अवैध दारू माफियांविरोधात आरपारची लढाई छेडण्याचा निर्धार करण्यात आला.

गावात दारू वाहते आणि पोलिस पाटील डोळे मिटून बसतो, हे आता खपवून घेतले जाणार नाही, असा स्पष्ट इशारा प्रांताधिकारी अरुण उंडे यांनी बैठकीत दिला. आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या सूचनेनंतर तहसील कार्यालयात महसूल, पोलिस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेण्यात आली. बैठकीत अवैध दारूविरोधात संयुक्त आणि कठोर कारवाईचा निर्णय घेण्यात आला. बैठकी दरम्यान उंडे यांनी दारूग्रस्त गावांचा आढावा घेत अधिकाऱ्यांना थेट जाब विचारला. कारवाई नेमकी काय केली? असा सवाल उपस्थित करत त्यांनी पोलिस व उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली.

बैठकीत मच्छिंद्र देशमुख यांनी दारूबंदी कायद्यातील त्रुटींवर प्रकाश टाकत राज्यस्तरावर कठोर धोरणाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. तहसीलदार सिद्धार्थ मोरे यांनीही त्याच त्याच गावात पुन्हापुन्हा अड्डे उभे राहतात, आता प्रशासन आणि ग्रामस्थांनी एकत्र येवून हे धंदे बंद करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

काही ठिकाणी परमिट रूममधूनच अवैध दारूचा पुरवठा होत असल्याचे गंभीर निरीक्षण नोंदवत संबंधित दुकानांचे परवाने रद्द करण्याची शिफारस करण्याचे आदेशही त्यांनी दिले. तालुका दारूबंदी शासकीय समितीचे अशासकीय सदस्य हेरंब कुलकर्णी यांनीही बैठकीत प्रशासनावर टीका करत अवैध दारू वाहतुकीचा मुद्दा उपस्थित केला. संगमनेर परिसरातून दररोज अवैध दारूच्या गाड्या खुलेआम फिरतात, तरीही यंत्रणा निष्क्रिय आहे, असा आरोप त्यांनी केला. यावर उंडे आणि पोलिस अधिकाऱ्यांनी पोलिस पाटलांना स्पष्ट इशारा दिला.

# खोटा गुन्हा, चौकशी करण्याची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई** : वडिलापरजीत शेत जमिनीच्या वादातून माझ्या विरोधात खोटा गुन्हा दाखल करण्यात आला असून, या गुन्ह्याची पारदर्शकपणे निपक्षपाती चौकशी करून माझ्यावरील अन्याय दूर करण्याची मागणी सोनई येथील शेतकरी अनिल भळगट यांनी मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस प्रमुखाकडे ई- मेलद्वारे निवेदनाद्वारे केली आहे.

भळगट यांनी पाठवलेल्या निवेदनात नमूद केले की, सोनई हनुमानवाडी शिवारातील गट क्रमांक ५८३/२ मधील वडिलोपार्जित शेत जमिनीबाबत न्यायालयात दिवाणी दावा तसेच प्रांत अधिकाऱ्याकडे महसूल अपील प्रलंबित आहे. ही प्रक्रिया चालू असताना विरोधी पक्षकारांनी महसूल विभागातील अधिकाऱ्यांना हाताला धरून अनाधिकृत फेरफार मंजूर केल्याचा संशय व्यक्त करून या प्रकरणात पोलिसांनी आपल्या पदाचा गैरवापर करून जमीन ताब्यातून सोडण्यास तसेच फौजदारी प्रकरण मागे घेण्यासाठी पोलिसांनी दबाव टाकल्याचा आरोपही निवेदनात केलेला आहे.

या दबावाला दाद न दिल्यामुळे ५ जून २०२६ रोजी १५ ते २० अनोळखी महिलाविरुद्ध खोटा व बनावट गुन्हा दाखल केला गेला आहे.त्यामुळे माझे कुटुंब मानसिक धक्क्याखाली असून जीवितास धोका निर्माण झाल्याचे नमूद केले आहे.

# नऊ अवैध दारु गुत्यांवर बुलडोझर

## पाच जणांवर गुन्हे दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शहरातील अवैध दारू विक्री आणि हातभट्टीच्या व्यवसायाविरोधात शहर पोलिसांनी कारवाई करत नऊ अनधिकृत दारू गुत्त्यांची शेड जमीनदोस्त केली. यासोबतच अवैधरित्या देशी-विदेशी दारू तसेच गावठी हातभट्टीची दारू विक्री करणाऱ्या पाच जणांविरोधात कारवाई करून २० हजार ७८५ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी कोतवाली व तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली ही संयुक्त मोहीम राबविण्यात आली.

शहरातील वाढत्या अवैध दारू विक्रीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या मदतीने ही धडक पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गाडगीळ पटांगण, भाजी मार्केट परिसरातील अतुल दातरंगे याचा गुत्ता, कल्याण रस्त्यावरील अमरधाम परिसरातील संतोष नवगिरे वंजारे याचा गुत्ता, बोल्हेगावमधील संतोष सरोदे, बबीता शिंदे व बाळासाहेब वाघमारे यांच्या ठिकाणांवरील शेड, तसेच तपोवन रस्ता परिसरातील आशिष लोखंडे, सुरज शिंदे आणि यशोदानगरातील पवार याच्या अनधिकृत दारू गुत्त्यांची शेड जमीनदोस्त करण्यात आली.

या मोहिमेदरम्यान पोलिसांनी विविध ठिकाणी छापे टाकून अवैधरित्या देशी व विदेशी मद्य तसेच गावठी हातभट्टीची दारू विक्री करणाऱ्यांविरोधात कारवाई केली. त्यांच्याकडून २० हजार ७८५ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधितांविरोधात गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. ही कारवाई कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड, तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

# नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन करणे काळाची गरज

## आ. आशुतोष काळे; कारखाना परिसरात केले वृक्षारोपण




**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे. हवामान बदलाचे संकट आणि वाढते तापमान यावर मात करायची असेल तर प्रत्येकाने हरित पर्यावरणासाठी वृक्षारोपण करणे आणि आपल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन करण्याचा दृढ संकल्प करणे काळाची गरज असल्याचे मत आमदार आशुतोष काळे यांनी केले. कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या वतीने पर्यावरण दिनाचे औचित्य साधत परिसरात वृक्षरोपण करण्यात आले.

याप्रसंगी ते बोलत होते. आ. काळे पुढे म्हणाले की, औद्योगिक आणि सामाजिक प्रगती साधत असताना आपण निसर्गाचे देणे लागतो ही भावना विसरून चालणार नाही. कारखान्यासारख्या औद्योगिक परिसरात हरित पट्टा निर्माण केल्याने प्रदूषण नियंत्रणात मोठी मदत होते. केवळ झाडे लावणे पुरेसे नसून त्यांचे संगोपन करून ती जगवणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे.

यावर्षी शासनाने पर्यावरण दिनानिमित्त पृथ्वी देत असलेल्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष करू नका, हवामानासाठी त्वरित कृती करणे गरजेचे असल्याची संकल्पना ठरवली आहे. प्रत्येकाने या संकल्पनेचा गांभीर्याने विचार करून एक नागरिक एक झाड ही संकल्पना प्रत्येकाने आपल्या जीवनात उतरवण्याचे आवाहन यावेळी आ. आशुतोष काळे यांनी उपस्थितांना केले.

# शिर्डी बसस्थानकाला द्वितीय पुरस्कार !



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने २०२५-२६ या वर्षात आयोजित करण्यात आलेल्या अत्यंत प्रतिष्ठेच्या हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियानात आंतरराष्ट्रीय तीर्थक्षेत्र असलेल्या शिडी येथील बसस्थानकाने नाशिक विभागात ब गटात द्वितीय क्रमांक पटकावला असून या उल्लेखनीय यशाबद्दल महामंडळाकडून शिर्डी बसस्थानकास पाच लाख रुपयांचे बक्षीस आणि सन्मानचिन्ह महामंडळाचे उप प्रादेशिकव्यवस्थापक विजय गिते यांच्या हस्ते देण्यात आले.

या यशाने शिर्डी नगरीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून संपूर्ण तालुक्यातून व जिल्ह्यातून या कामगिरीचे जोरदार कौतुक होत आहे. दरम्यान या बसथानकात दररोज मितीला राज्यासह पार राज्यातून सुमारे ५७३ बसेस येतात त्यातील ६५ बस मुक्कामी असतात. संपूर्ण बसस्थानकात स्वच्छता करण्यासाठी फक्त दोनच कर्मचारी आहे. असे असतानाही विभागात दुसरा क्रमांक पटकावल्याने विशेष कौतुकाची थाप पडली आहे. विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप, कोपरगाव व्यवस्थापक अमोल बनकर, बसस्थानक प्रमुख नानासाहेब आहेर, शिर्डी बसस्थानकाचे कर्तव्यदक्ष वाहतूक नियंत्रक सचिन सोमवंशी, सुनील मुजमले, रामहरी गव्हाणे, दत्तात्रय पवार, स्वच्छता कर्मचारी महादेव कांबळे, जयप्रकाश अस्वले आदींचे योगदान लाभले आहे.

# भाजपच्यावतीने स्व. मुंडेंच्या स्मृतींना उजाळा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : भारतातील जवळजवळ सर्व राज्यांमध्येच सत्ता असलेला भाजपा हा सर्वात मोठा राष्ट्रीय पक्ष आहे. लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांनी प्रतिकूल परिस्थितीत काम करून भारतीय जनता पार्टीचा जो पाया रोवला त्याच पायावर आज पक्षाची आज समृद्ध इमारत उभी आहे.

स्व. गोपीनाथ मुंडे यांनी घराणेशाही, साखर सम्राट, काँग्रेस पक्षाची मक्तेदारी मोडीत काढत भाजपाची सत्ता राज्यात आणून मुंबई दहशत मुक्त केली. त्या काळात त्यांनी जे कार्य केले ते सर्वांसाठी आदर्शवत व प्रेरणादायी आहे त्यांनी दाखवलेल्या वाटेवरच आपण मार्गक्रमत होऊन देशसेवेचे राष्ट्रीय हिताचे काम करू. नगरवर गोपीनाथ मुंडे यांचे विशेष प्रेम होते. त्यामुळेच त्यांच्या विचार, कार्य व स्मृती प्रत्येकाच्या मनात कायमच्या कोरल्या गेलेल्या आहेत, असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले.

अहिल्यानगर शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने राज्याचे माजी उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त पक्ष कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस जिल्हधयक्ष अनिल मोहिते यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय जनता पार्टी सरचिटणीस महेश नामदे, निखिल वारे व अशोक गायकवाड, महिला आघाडीच्या अध्यक्षा कालिंदी केसकर, युवा मोर्चाचे अध्यक्ष ऋद्रेश आंबाडे आदींसह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीचे प्रस्ताविक महेश नामदे यांनी केले.

# शेवगावात छत्रपती शिवरायांना अभिवादन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शेवगाव शहरात उत्साहपूर्ण वातावरणात छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवप्रेमी नागरिक, लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याला व स्वराज्य स्थापनेतील महान योगदानाला विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवसेना नेते अरुण मुंढे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. शिवरायांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून समाजहित, जनसेवा आणि राष्ट्रहिताची कार्ये अधिक जोमाने करण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे स्मरण केले. स्वराज्य स्थापनेसाठी त्यांनी दिलेले योगदान, सर्वसामान्य जनतेसाठी उभारलेली लोकाभिमुख व्यवस्था तसेच धर्मनिरपेक्ष आणि न्यायाधिष्ठित प्रशासन यांचा उल्लेख करून त्यांच्या आदर्शांचे अनुसरण करण्याचे आवाहन करण्यात आले.

याप्रसंगी , ताहेरभाई पटेल, प्रेमभाऊ जाजू, राजूभाऊ तरटे, नगरसेवक वजीरभाई पठाण, नगरसेवक जाकीरभाई कुरेशी, नगरसेवक बाबासाहेब लांडे, माजी नगरसेवक दिगंबर तात्या काथवटे, माजी नगरसेवक अंकुश आण्णा कुसळकर, अभय पालवे तसेच शहरातील शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहनपर वैरण बियाणे वाटप योजना

## पशुपालक व शेतकऱ्यांना लाभ घेण्याचे आवाहन



*अनेक भागांमध्ये हिरव्या चाऱ्याची टंचाई जाणवत आहे. काही शेतकऱ्यांकडे जनावरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध असला तरी अनेक पशुपालकांना चाऱ्याअभावी अडचणींचा सामना करावा लागत आहे. पशुपालकांच्या या समस्येची दखल घेत पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभागामार्फत प्रोत्साहनपर वैरण बियाणे वाटप योजना सुरू करण्यात आली आहे.*

**अमोल खताळ, आमदार.**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : संगमनेर तालुक्यातील पशुपालक आणि शेतकऱ्यांना वर्षभर दर्जेदार हिरवा चारा उपलब्ध व्हावा तसेच जनावरांच्या वैरणीचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागावा, या उद्देशाने आमदार अमोल खताळ यांच्या पुढाकारातून प्रोत्साहनपर वैरण बियाणे वाटप योजना सुरू करण्यात आली आहे.

पंचायत समितीच्या पशुसंवर्धन विभागामार्फत ही योजना राबविण्यात येत असून तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांना याचा लाभ दिला जाणार आहे. सध्या बदलत्या हवामानाचा शेती आणि पशुपालन व्यवसायावर मोठा परिणाम होत आहे.

अनियमित पाऊस, वाढते तापमान आणि चाऱ्याची कमतरता यामुळे पशुपालकांसमोर अनेक अडचणी निर्माण होत आहेत. विशेषतः उन्हाळ्याच्या काळात हिरव्या चाऱ्याची टंचाई भासत असल्याने जनावरांच्या आरोग्यावर परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी पौष्टिक, मुबलक आणि वर्षभर उपलब्ध राहील असा हिरवा चारा उत्पादनाला चालना मिळावी, या हेतूने ही योजना सुरू करण्यात आली आहे.

योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना वैरण पिकांच्या बियाण्यांचे वितरण करण्यात येणार आहे. या बियाण्यांच्या माध्यमातून शेतकरी स्वतःच्या शेतात चारा पिकांचे उत्पादन वाढवू शकतील. त्यामुळे जनावरांसाठी वर्षभर हिरवा चारा उपलब्ध होण्यास मदत होणार असून पशुधनाचे संगोपन अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. तसेच पशुपालकांच्या आर्थिक खर्चातही बचत होण्यास मदत होईल.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह संगमनेर पंचायत समितीच्या पशुसंवर्धन कार्यालयाशी अथवा तालुक्यातील २४ पशुसंवर्धन दवाखान्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी पुंडलिक येवले यांनी केले आहे.

# 'श्री मुलिकादेवी' च्या प्राचार्यपदी गाडगे



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या निघोज येथील श्री मुलिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य म्हणून श्रीमती मनिषा गाडगे यांची प्राचार्य म्हणून नियुक्ती करण्यात आली. प्राचार्य म्हणून कार्यरत असलेले अंकुशराव अवघडे हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले.

त्यांच्या शिस्तप्रिय व कामसू स्वभावामुळे त्यांनी निघोज परिसरातील शैक्षणिक क्षेत्रात विशेष नावलौकिक प्राप्त केला. यानिमित्त विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. तर विद्यालयातील इतर शिक्षकांनी मिळवलेल्या पदोन्नती बद्दल त्या शिक्षकांचाही गौरव सोहळा उत्साहात पार पडला. नूतन प्राचार्या श्रीमती गाडगे यांनी विज्ञान विषयात पदव्युत्तर पदवी संपादन करून, शास्त्र मध्ये पदवी पूर्ण केली असून शैक्षणिक क्षेत्रात त्यांचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांनी टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पर्यवेक्षक म्हणून सेवा बजावत प्रशासकीय व शैक्षणिक नेतृत्वाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली. यावेळी संस्थेच्या वतीने माजी सचिव जी. डी. खानदेशे यांच्या हस्ते नूतन प्राचार्या मनिषा गाडगे, उपप्राचार्या निर्मला सोबले, पर्यवेक्षक जयवंतराव पुजारी यांचा सत्कार करण्यात आला.

# नागरिकांच्या प्रश्नांसाठी आ. कर्डिले थेट मैदानात

## राहुरीत जनता दरबार; पाणी, रस्ते, वीज प्रश्नांवर आ. कर्डिलेंकडून तातडीची दखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आ. अक्षय शिवाजीराव कर्डिले यांनी राहुरी येथील जनसंपर्क कार्यालयात पहिल्यांदाच जनता दरबार आयोजित करून नागरिकांच्या विविध समस्या व अडचणी प्रत्यक्ष जाणून घेतल्या. विधानसभा निवडणुकीनंतर प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या या जनता दरबाराला मतदारसंघातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




जनता दरबारात पाणीपुरवठा, रस्ते, वीज, आरोग्य, शिक्षण, महसूल तसेच विविध शासकीय योजनांशी संबंधित प्रश्न नागरिकांनी आमदार कर्डिले यांच्यासमोर मांडले. यावेळी आमदारांनी प्रत्येक नागरिकाचे म्हणणे संयमाने ऐकून घेत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधत अनेक प्रश्नांच्या तातडीने निवारणासाठी सूचना दिल्या. तसेच प्रलंबित प्रश्नांबाबत आवश्यक पाठपुरावा करून नागरिकांना न्याय मिळवून देण्याची ग्वाही दिली.

दरबारात स्व. शिवाजीराव कर्डिले यांनी जनतेशी कायम जिव्हाळ्याचे संबंध ठेवत लोकाभिमुख कार्यपद्धती राबविली होती. त्याच कार्यशैलीचा वारसा पुढे नेत आमदार अक्षय कर्डिले यांनीही जनतेशी थेट संवाद साधण्याला प्राधान्य दिले आहे. त्यामुळे मतदारसंघातील नागरिकांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत असून त्यांच्या कामकाजाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

जनसंपर्क कार्यालयात सकाळपासूनच नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. विविध गावांमधून आलेल्या नागरिकांनी आपल्या समस्या मांडत विकासकामांबाबत अपेक्षा व सूचना व्यक्त केल्या. लोकप्रतिनिधीने स्वतः वेळ देऊन समस्या ऐकून घेतल्याबद्दल उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

> राहुरी – नगर – पाथर्डी मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाच्या समस्या सोडविण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. विकासकामांना गती देतानाच सर्वसामान्यांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले जाईल. जनतेशी सातत्याने संपर्क ठेवून त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहणार आहोत.
>
> **– अक्षय कर्डिले, आमदार**

# शेतजमिनीच्या वादातून घरावर हल्ला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई :** नेवासा तालुक्यातील सोनई परिसरात शेतजमिनीच्या ताब्याच्या वादातून एका शेतकऱ्याच्या घरात घुसून तोडफोड, चोरी व धमकी दिल्याची गंभीर घटना घडली आहे. याप्रकरणी सोनई पोलिस ठाण्यात १५ ते २० अनोळखी महिलांसह एका व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भास्कर सोन्याबापू पालवे (वय ४५, रा. विठ्ठलवाडी, गणेशवाडी, ता. नेवासा) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या तक्रारीवरून अनिल हेमराज भळगट (रा. सोनई) व त्यांच्यासोबत आलेल्या १५ ते २० अनोळखी महिलांविरोधात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना दि. ५ जून रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास गट क्रमांक ५८३/२/ब मधील शेतजमिनीत घडली. फिर्यादींच्या म्हणण्यानुसार, आरोपींनी त्यांच्या शेतात व घरात अनधिकृतपणे प्रवेश करून शिवीगाळ, दमदाटी व गोंधळ घातला. संबंधित महिलांनी ही जमीन अनिल भळगट यांनी कसण्यासाठी दिली असल्याचे सांगत फिर्यादींना तेथून निघून जाण्याची धमकी दिली.

या प्रकरणी सोनई पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सोनई पोलीस करीत आहेत.

# खर्ड्यात २५ वर्षांच्या वटवृक्षाचे पूजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**खर्डा :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त खर्डा इंग्लिश स्कूल परिसरातील गेल्या २५ वर्षांपासून परिसराला सावली, शुद्ध हवा आणि पर्यावरणीय समतोल देणाऱ्या भव्य वटवृक्षाचे विधिवत पूजन करण्यात आले. पर्यावरण संरक्षण आणि वृक्षसंवर्धनाचा संदेश देणाऱ्या या प्रेरणादायी उपक्रमाला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



या वटवृक्षाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिलांनी वटवृक्षाला हार अर्पण करून फेटा बांधला तसेच औक्षण करून वृक्षाप्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असल्याचे सांगत प्रत्येक नागरिकाने वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. वृक्ष लावा, वृक्ष जगवा हा संदेश देत पर्यावरण संरक्षणाची सामूहिक जबाबदारी प्रत्येकाची असल्याचे अधोरेखित करण्यात आले.

आज परिसराचा आधारस्तंभ ठरलेल्या या वटवृक्षाची लागवड २५ वर्षांपूर्वी ग्रामपंचायत सदस्य महालिंग कोरे यांनी केली होती. या कार्यक्रमास सरपंच संजीवनी पाटील, राणी महानवर, अहिल्याबाई मुळे, प्रतीक्षा गोलेकर, जयश्री गोपाळघरे, ज्ञानेश्वर चौरे, अंजली कोरे, कैलास धनलगडे, महेश दिंडोरे, बाळासाहेब गीते, राजू मोरे, आकाश खेडकर, संतोष लष्करे, ज्ञानेश्वर मिसाळ, सागर चव्हाण, रोहन सकट, आकाश सकट, डॉ. सोपान गोपाळघरे, संतोष थोरात, धनसिंग साळुंके, संग्राम पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कार जाळल्यानंतर दुचाकी पेटवण्याचा प्रयत्न

## आ. संग्राम जगताप यांची घटनास्थळी पाहणी, आरोपींना अटक करण्याची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहरातील शनी चौक परिसरातील गुजर गल्लीमध्ये सलग दुसऱ्या दिवशी घडलेल्या धक्कादायक घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काल मध्यरात्री गौरव विनायक कुलकर्णी यांच्या घरासमोर उभ्या असलेल्या दोन आलिशान कारना आग लावून त्या पूर्णतः जाळून खाक करण्यात आल्या होत्या. या घटनेची धग अद्याप कायम असतानाच आज पुन्हा त्यांच्या दुचाकीला आग लावण्याचा प्रयत्न झाल्याने हा प्रकार अपघाती नसून पूर्वनियोजित घातपात असल्याचा संशय अधिक बळावला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, काल रात्री सुमारे २.३० वाजण्याच्या सुमारास गौरव कुलकर्णी यांच्या घरासमोर पार्क केलेल्या महिंद्रा एक्सयुवी ५०० आणि ह्युंदाई एक्स्टर या दोन चारचाकी वाहनांना आग लावण्यात आली. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण करत दोन्ही वाहने पूर्णतः जळून खाक झाली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती.

> नागरिकांच्या जीवित आणि मालमत्तेच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी पोलीस प्रशासनाने अधिक सतर्क राहणे गरजेचे आहे. सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसणाऱ्या संशयित आरोपींचा तात्काळ शोध घेऊन त्यांना अटक करण्यात यावी. अशा घटनांमधून भविष्यात एखादा मोठा अनर्थ घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधित आरोपींवर कठोर कारवाई करून कायद्याचा धाक निर्माण करणे आवश्यक आहे.
>
> **– संग्राम जगताप, आमदार**

दरम्यान, आज पुन्हा मध्यरात्री त्यांच्या दुचाकीला आग लावण्याचा प्रयत्न झाल्याचे समोर आले आहे. या सलग घडणाऱ्या घटनांमुळे कुलकर्णी कुटुंबीयांसह संपूर्ण परिसरात भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

घटनेची गंभीर दखल घेत आमदार संग्राम जगताप यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. त्यांनी कुलकर्णी कुटुंबीयांची भेट घेत त्यांना धीर दिला.

# कोल्हार न्यू इंग्लिश स्कूलमध्ये वृक्षारोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, कोल्हार बुद्रुक येथे शुक्रवारी (५ जून) वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात शिक्षक, विद्यार्थी व पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



विद्यालयाचे माजी विद्यार्थी शिरीष कापसे यांनी त्यांचा मुलगा राजवीर यांच्या पाचव्या वाढदिवसानिमित्त विद्यालयास पाच देशी वृक्षांची रोपे भेट देत सामाजिक बांधिलकीचे उदाहरण घालून दिले. यावेळी संपत कापसे, कुटुंबीय तसेच राजवीर उपस्थित होते. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमास प्राचार्य अंकुशराज जामदार, पर्यवेक्षिका एस. बी. आंधळे, गुरुकुल प्रमुख के. आर. कचरे, विभाग प्रमुख डी. ए. घवले आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक एस. बी. शेख यांनी केले.

प्राचार्य अंकुशराज जामदार यांनी देशी वृक्षांचे पर्यावरण संवर्धनातील महत्त्व अधोरेखित करत प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनीही वृक्षसंवर्धनाची शपथ घेत पर्यावरण रक्षणाचा संकल्प केला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण झाली असून परिसर हरित करण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी घोडके यांनी आभार मानले.

# पर्यावरण संरक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी

## विजयकुमार मेहेत्रे; करजगावात पर्यावरण दिनानिमित्त विशेष ग्रामसभा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करजगाव :** सुरक्षित गाव आणि स्वच्छ वातावरण निर्माण करण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण करणे अत्यंत गरजेचे असून ती प्रत्येक ग्रामस्थाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन ग्रामपंचायत अधिकारी विजयकुमार मेहेत्रे यांनी केले.

नेवासा तालुक्यातील करजगाव येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित विशेष ग्रामसभेत ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच अनिता गायकवाड होत्या.

यावेळी आयोजित ग्रामसभेत स्वच्छ गाव, सुरक्षित वातावरण या संकल्पनेवर भर देण्यात आला. ग्रामविकास अधिकारी विजयकुमार मेहेत्रे यांनी घनकचरा व्यवस्थापन, प्लास्टिकमुक्ती, वृक्षसंवर्धन, जलसंधारण, सांडपाणी व्यवस्थापन तसेच प्लास्टिक बंदी यांसारख्या विषयांवर उपस्थित ग्रामस्थांना सविस्तर मार्गदर्शन केले. गाव स्वच्छ व निरोगी ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सक्रिय सहभाग घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात महिको कंपनीचे महाजन, सोनवणे, भाकरे तसेच तलाठी अंकुश सोनार यांनीही पर्यावरण संवर्धनासंदर्भात मार्गदर्शन केले.



> २०११ पूर्वीच्या निवासी अतिक्रमणांना नियमानुकूल करण्याबाबतही ग्रामसभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. विविध शासकीय नियम व प्रक्रियेची माहिती ग्रामस्थांना देण्यात आली. झाडे लावणे महत्त्वाचे असले तरी त्यांचे संगोपन करणे अधिक गरजेचे आहे. प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याची जबाबदारी घ्यावी.
>
> **– अनिता गायकवाड, सरपंच**

# १६ वर्षांनंतर आंदोलनकर्त्यांची निर्दोष मुक्तता



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** शेतकऱ्यांच्या कृषी वीजपुरवठ्यासाठी काढण्यात आलेल्या आंदोलनानंतर दाखल झालेल्या गुन्ह्यातील सर्व आरोपींची तब्बल १६ वर्षांनंतर न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. अहिल्यानगर येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने संजय एकनाथ बडे, भगवान सुखदेव आव्हाड आणि इतर आंदोलकांना दिलासा देणारा निकाल दिला. अतिरिक्त सत्र न्यायाधीश राजेश एम. तयाडे यांनी हा निर्णय सुनावला.

येळी परिसरातील शेतकऱ्यांचा कृषी वीजपुरवठा थकीत वीजबिलांच्या कारणावरून बंद करण्यात आला होता. त्यामुळे शेतकऱ्यांची पिके धोक्यात आली होती. या पार्श्वभूमीवर ३ नोव्हेंबर २०१० रोजी संजय बडे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी येळी येथील वीज वितरण उपकेंद्रावर मोर्चा काढला होता. या आंदोलनात माजी पंचायत समिती सदस्य भगवान आव्हाड, माजी जिल्हा परिषद सदस्य स्वर्गीय सोमनाथ खेडकर यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते.

मोर्चानंतर प्रशासनाने शेतकऱ्यांचा वीजपुरवठा पूर्ववत केला. मात्र आंदोलन संपल्यानंतर महावितरणच्या अधिकाऱ्यांनी आंदोलकांविरोधात गुन्हा दाखल केला. महावितरण कार्यालयात घुसखोरी, सरकारी कामात अडथळा निर्माण करणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे, अधिकाऱ्यांना धमकी देणे आणि दंगल घडवून आणणे असे गंभीर आरोप करण्यात आले होते.

सरकारी कामात अडथळा, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान किंवा अधिकाऱ्यांवर बलप्रयोग केल्याचे आरोप संशयाच्या पलीकडे सिद्ध झाले नसल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे सरकारी पक्ष आरोप सिद्ध करण्यात अपयशी ठरल्याचे नमूद करत सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. या प्रकरणात आरोपींच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. गोरक्षनाथ पालवे यांनी प्रभावी बाजू मांडली, तर सरकार पक्षातर्फे सरकारी वकिलांनी कामकाज पाहिले.

# प्रदूषण रोखण्यासाठी झाडे लावा : कुलकर्णी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**टाकळीभान :** वाढते प्रदूषण आणि पर्यावरणाची होत असलेली हानी ही भविष्यासाठी धोक्याची घंटा असून, प्रदूषण टाळण्यासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संवर्धन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन डॉ. रोहित कुलकर्णी यांनी केले.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त लेट श्री एकनाथ नामदेव गटकळ इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

> देश प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असताना पर्यावरणाचा समतोल मात्र बिघडत चालला आहे. वाढते प्रदूषण, कमी होत चाललेली झाडांची संख्या आणि बदलते हवामान यामुळे भविष्यात गंभीर संकट निर्माण होऊ शकते. यासाठी आतापासूनच जनजागृती होणे आवश्यक आहे.
>
> **– डॉ. रोहित कुलकर्णी**

ॲड. टेमक व ॲड. सुरेखा टेमक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. सेंद्रिय शेतीचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. सेंद्रिय पद्धतीने पिकवलेले अन्न आरोग्यासाठी अधिक लाभदायक असून रासायनिक खतांचा अतिरेक पर्यावरणासाठी घातक ठरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


यावेळी शाळेच्या प्राचार्या कुदळे मॅडम यांनी पर्यावरण दिनाचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवर व पालकांच्या हस्ते शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

# विवाह समारंभ की श्रीमंतीचे प्रदर्शन?

## प्री-वेडिंग, लेझर शो अन् कोटींचा खर्च; लग्नाचा बदलता चेहरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** काही वर्षांपूर्वी शहरातील मंगल कार्यालयात लग्न होणे म्हणजे प्रतिष्ठेचे प्रतीक मानले जात होते. मात्र आता काळ बदलला आहे. शहरापासून दूर असलेल्या महागड्या रिसॉर्टमध्ये विवाह सोहळे करण्याची नवी फॅशन आली असून, हा केवळ बदल नसून सामाजिक दिखाव्याचा एक नवा आजार बनत चालला आहे.



आज लग्नासाठी दोन-दोन दिवस रिसॉर्ट बुक केले जातात. संपूर्ण लग्नघर आणि पाहुणे तेथे मुक्कामी राहतात. मात्र या समारंभांमध्ये आपलेपणापेक्षा दिखावा अधिक दिसून येतो. स्वतःची चारचाकी असलेले, आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि तथाकथित स्टेटसवाले लोकच अशा कार्यक्रमांना पोहोचू शकतात. निमंत्रण देणाऱ्यालाही अनेकदा हेच अपेक्षित असते.

आता लग्नासाठी एकच निमंत्रण न देता वेगवेगळ्या कार्यक्रमांसाठी स्वतंत्र आमंत्रणे दिली जातात. महिला संगीत, मेहंदी, कॉकटेल पार्टी, रिसेप्शन आणि खास पाहुण्यांसाठी सर्व कार्यक्रम असे वर्गीकरण केले जाते. त्यामुळे नातेसंबंधांतील आत्मीयता कमी होत असून, उपयोगी लोकांनाच महत्त्व दिले जात असल्याची भावना वाढीस लागली आहे.

महिला संगीतासाठी महागडे कोरिओग्राफर बोलावले जातात. संपूर्ण कुटुंबाला दिवसन्दिवस डान्सचे प्रशिक्षण दिले जाते. मेहंदी, हळद यासाठी स्वतंत्र तज्ज्ञ नियुक्त केले जातात. प्रत्येक कार्यक्रमासाठी विशिष्ट रंगाचे कपडे परिधान करणे अनिवार्य केले जाते. मेहंदीला हिरवा, हळदीला पिवळा रंग – जो हे पाळणार नाही, त्याच्याकडे कमीपणाने पाहिले जाते. ही परंपरा नसून सामाजिक दबावाची नवी पद्धत बनली आहे.

पूर्वी लग्न म्हणजे नातेवाईकांच्या भेटीगाठी, गप्पा, आनंद आणि एकोप्याचा उत्सव असायचा. आता रिसॉर्टमधील वेगवेगळ्या खोल्यांमध्ये प्रत्येक कुटुंब वेगळे राहते. मोबाइलवरून बोलावल्याशिवाय लोक बाहेर येत नाहीत. श्रीमंतीच्या स्पर्धेत माणुसकी आणि आत्मीयता हरवत चालल्याचे चित्र दिसते.

लग्नस्थळी नवदांपत्याचे प्री-वेडिंग फोटोशूट, फिल्मी शैलीतील व्हिडिओ आणि मोठ्या स्क्रीनवरील प्रदर्शन हे आता अनिवार्यच झाले आहे.

### दिखाव्याच्या संस्कृतीवर चिंतन करा

आपल्या आई-वडिलांवर त्यांच्या क्षमतेपेक्षा जास्त खर्चाचा दबाव टाकू नका. तुमचे लग्न हे त्यांच्या आयुष्यभराच्या त्यागाचे फलित आहे. दिखाव्यापेक्षा आत्मसन्मान आणि साधेपणाने वैवाहिक जीवनाची सुरुवात करा. समाजासाठी आदर्श निर्माण करा. समाजाने आता या वाढत्या दिखाव्याच्या संस्कृतीवर गंभीर चिंतन करण्याची गरज आहे. विवाह समारंभ हा आनंद, नाते आणि संस्कार यांचा उत्सव राहावा; तो केवळ श्रीमंतीच्या प्रदर्शनाचा मंच बनू नये.

# आपटे मूकबधिर विद्यालयात वृक्षारोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शहरातील जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालयात भारतीय लहुजी सेनेच्या वतीने वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन आणि हरित भविष्यासाठी समाजात जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम उत्साहात पार पडला. वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय आरोटे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आली. भारतीय लहुजी सेनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुनील सकट आणि भटक्या विमुक्त समाज संघटनेचे शहराध्यक्ष राजाभाऊ वाडेकर यांच्या पुढाकाराने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी प्रशांत मस्तूद, सचिन घुमरे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

वृक्षारोपणानंतर उपस्थितांनी लावलेल्या वृक्षांचे संगोपन करण्याचा संकल्प केला. पर्यावरणाचे वाढते प्रश्न, तापमानवाढ, प्रदूषण आणि जंगलतोड याबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच प्रत्येकाने आपल्या आयुष्यात किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

वडापाववर 'मुंडे'ची नजर

# पॅकिंगसाठी वृत्तपत्राचा कागद वापरल्यास कारवाई





**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर / मुंबई** : अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी राज्यभरातील वडापाव, भेळ, समोसा आणि इतर खाद्यपदार्थ विक्रेत्यांना महत्त्वाचा इशारा दिला आहे. खाद्यपदार्थ बांधून देण्यासाठी किंवा थेट संपर्कात ठेवण्यासाठी वृत्तपत्राचा कागद वापरणे आरोग्यासाठी घातक असल्याने अशा प्रकारांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. मुंबईत अशा प्रकरणांवर कारवाईची सुरुवात झाली असून आता राज्यभर ही मोहीम अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

रस्त्यावरील खाद्यपदार्थ विक्रेत्यांकडे वडापाव, भजी, भेळ, समोसे यांसारखे पदार्थ वृत्तपत्राच्या कागदात गुंडाळून देण्याची पद्धत अनेक वर्षांपासून रूढ आहे. ग्राहकांनाही ती सवयीची झाली असली तरी आरोग्याच्या दृष्टीने हा प्रकार धोकादायक असल्याचे अन्न व औषध प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे पर्यायी आणि अन्नसुरक्षेला पूरक पॅकिंग साहित्य वापरण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत.

**रद्दी बाजारावरही परिणाम?**

या निर्णयाचा अप्रत्यक्ष परिणाम वृत्तपत्रांच्या रद्दी बाजारावर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. वडापाव, भेळ, फरसाण आणि इतर खाद्यपदार्थांच्या पॅकिंगसाठी मोठ्या प्रमाणावर जुनी वृत्तपत्रे वापरली जात असल्याने या मागणीत घट झाल्यास रद्दी कागदाच्या किंमतींवर दबाव येऊ शकतो. मात्र, आरोग्य आणि अन्नसुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय आवश्यक असल्याचे प्रशासनाचे मत आहे.

**ग्राहकांच्या आरोग्याला प्राधान्य**

रस्त्यावरील खाद्यसंस्कृती ही महाराष्ट्राच्या जीवनशैलीचा अविभाज्य भाग असली तरी अन्नसुरक्षेच्या नियमांमध्ये कोणतीही तडजोड स्वीकारली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश या मोहिमेतून दिला जात आहे. वडापाव आणि भेळीसारख्या लोकप्रिय पदार्थांचा आस्वाद घेताना ग्राहकांच्या आरोग्याची सुरक्षा सर्वोच्च ठेवण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून केला जात असल्याचे या निर्णयातून दिसून येत आहे.

## विक्रेत्यांसाठी इशारा

अन्न व औषध प्रशासनाने विक्रेत्यांना अन्नसुरक्षा नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. तपासणीदरम्यान वृत्तपत्राचा कागद वापरल्याचे आढळल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई केली जाणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत. त्यामुळे रस्त्यावरील खाद्यपदार्थ विक्रेत्यांना आता फूड-ग्रेड पेपर, बटर पेपर किंवा मान्यताप्राप्त पॅकिंग साहित्याचा वापर करावा लागणार आहे.

## वृत्तपत्राचा कागद धोकादायक का?

तज्ज्ञांच्या मते वृत्तपत्रांच्या छपाईसाठी वापरण्यात येणाऱ्या शाईमध्ये विविध प्रकारची रसायने, रंगद्रव्ये, बाइंडर्स आणि जड धातूंचा समावेश असतो. विशेषतः गरम व तेलकट पदार्थांचा संपर्क आल्यास ही रसायने अन्नामध्ये मिसळण्याची शक्यता वाढते. दीर्घकाळ अशा अन्नाचे सेवन केल्यास पचनसंस्थेचे विकार, यकृत व मूत्रपिंडांवरील दुष्परिणाम तसेच इतर गंभीर आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात. याशिवाय वृत्तपत्रांचे वितरण, वाहतूक आणि हाताळणी अनेक स्तरांवर होत असल्याने त्यावर धूळ, जंतू आणि इतर अशुद्ध घटक जमा होण्याची शक्यता असते. अशा कागदाचा अन्नपदार्थांशी थेट संपर्क आल्यास अन्नजन्य आजारांचा धोका वाढू शकतो.

# 'एक पेड माँ के नाम' उपक्रमातून श्रीरामपुरात पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत श्रीरामपूर शहर भारतीय जनता पक्ष व भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने पंचशील नगर, जुन्या कचेरी परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनासोबतच मातृऋणाची जाणीव जपणारा हा उपक्रम नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे विशेष ठरला.

अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर आणि शहराध्यक्ष जितेंद्र छाजेड यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे संयोजन भाजप नेते मारुती बिंगले आणि युवा मोर्चाचे शहराध्यक्ष रुपेश हरकल यांनी केले.

यावेळी भाजप गटनेत्या वैशाली चव्हाण, नगरसेवक दीपक चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष रवी गुलाटी, तिलक डुंगरवाल, भाजप सरचिटणीस विशाल अंभोरे, शहर उपाध्यक्ष विजय आखाडे, आनंद बुधेकर, महिला मोर्चा शहराध्यक्षा डॉ. स्वाती चव्हाण, ज्येष्ठ नेते अरुण धर्माधिकारी, पुष्पा हरदास, पूजा चव्हाण, राजलक्ष्मी चव्हाण यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमात युवा मोर्चाचे महेश सुळ, किरण कर्नावट, पंकज ललवाणी, अमन अलग, संकेत पाटील, रुद्रप्रताप कुलकर्णी, अनिल खंडागळे, बंडुकुमार शिंदे, मनोज भिसे, रवि पंडित, योगेश ओझा तसेच ब्राह्मंड फाउंडेशनचे निलेश गिते, अजय जनवेजा, बाळासाहेब हरदास, राजू काळे, सूरज सूर्यवंशी, श्रेयश झिरंगे, साजिद शेख, मुन्नाभाई शेख, राहुल राऊत यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# शालेय वाहनांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह; जिल्हाभर तपासणीची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**माळवाडगाव** : विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी संबंधित शालेय वाहनांबाबत शासनाने घालून दिलेल्या नियमांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी होत आहे का, याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करत अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व शालेय वाहनांची विशेष तपासणी मोहीम राबविण्याची मागणी भाजप सोशल मीडिया सेलचे संयोजक तथा पत्रकार संदीप आसने यांनी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे केली आहे. यासंदर्भातील निवेदन त्यांनी प्रशासनाला सादर केले आहे.




विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा विषय अत्यंत संवेदनशील असून शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या अनेक वाहनांमध्ये शासन नियमांचे काटेकोर पालन होत नसल्याचे चित्र दिसून येत असल्याचा दावा आसने यांनी निवेदनात केला आहे. राज्य शासन, परिवहन विभाग तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शालेय वाहनांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा, जीपीएस ट्रॅकिंग प्रणाली, अग्निशामक यंत्र, प्रथमोपचार पेटी, आपत्कालीन बाहेर पडण्याची व्यवस्था, महिला परिचारिका, चालक व परिचारकांची पोलीस पडताळणी, वैध परवाने, फिटनेस प्रमाणपत्र आणि विमा संरक्षण यांसारख्या सुविधा व कागदपत्रे अनिवार्य आहेत. मात्र प्रत्यक्षात अनेक वाहनांमध्ये या नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय, अनुदानित, विनाअनुदानित तसेच खासगी शाळांमधील विद्यार्थी वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या बस, व्हॅन, रिक्षा आणि इतर वाहनांची व्यापक तपासणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यासाठी शाळांकडून आवश्यक माहिती मागवून तिची पडताळणी करावी आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शाळा व्यवस्थापनांवर तसेच वाहनचालकांवर कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करावी, असेही निवेदनात म्हटले आहे. याशिवाय जिल्हास्तरावर विशेष तपासणी पथके स्थापन करून शाळा सुरू होण्याच्या आणि सुटण्याच्या वेळेत प्रत्यक्ष तपासणी मोहीम राबविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली आहे. मुख्याध्यापकांची जबाबदारी निश्चित करून शासन निर्देशांचे शंभर टक्के पालन सुनिश्चित करण्याचे आदेश देण्यात यावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा विषय हा हजारो पालकांच्या विश्वासाशी आणि मुलांच्या जीविताशी थेट संबंधित असल्याने प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कारवाई करावी. तसेच करण्यात आलेल्या तपासणी व कारवाईचा अहवाल सार्वजनिक करून पारदर्शकता राखावी, अशी अपेक्षा संदीप आसने यांनी व्यक्त केली आहे.

# एसएसजीएम महाविद्यालयात पर्यावरण दिन उत्साहात; वृक्षारोपणातून संवर्धनाचा संदेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : पर्यावरण संवर्धनाचा संदेश कृतीतून देत जागतिक पर्यावरण दिनानिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरु गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स महाविद्यालयात वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि हरित परिसर निर्मितीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमात प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि पर्यावरणीय असंतुलन यांसारख्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर वृक्षसंवर्धनाची गरज अधोरेखित करण्यात आली.



या उपक्रमात कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. बंडेराव तऱ्हाळ, विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ. घनश्याम भगत, वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य डॉ. अर्जुन भागवत, प्रा. डॉ. चंद्रभान चौधरी, डॉ. संतोष पवार, डॉ. देविदास रणधीर, डॉ. बी. एम. वाघमोडे, प्रा. किरण पवार, प्रा. प्रदीप जगझाप तसेच कार्यालय अधीक्षक सुनील गोसावी उपस्थित होते. महाविद्यालयातील ज्युनिअर व सिनिअर विभागांचे विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचा निर्धार व्यक्त केला.

# लिंगनिदान रॅकेटचा आणखी एक धागा उलगडला

## १९वी अटक, पाचवे सोनोग्राफी मशीन जप्त

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : राज्यभर खळबळ उडवून देणाऱ्या अवैध गर्भलिंग निदान आणि बेकायदेशीर गर्भपात प्रकरणाच्या तपासात पोलिसांना आणखी एक मोठे यश मिळाले आहे. तब्बल १९ आरोपींना अटक, सहा डॉक्टर गजाआड आणि पाच सोनोग्राफी मशिनांची जप्ती अशा टप्प्यावर पोहोचलेल्या या कारवाईत आता श्रीगोंदा तालुक्यातील मेडिकल चालकाला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून आणखी एक बेकायदेशीर सोनोग्राफी मशीन आणि चारचाकी वाहन जप्त करण्यात आले आहे.

लोणी पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या या गुन्ह्याचा तपास जसजसा पुढे सरकत आहे, तसतसे राज्यभर पसरलेल्या लिंगनिदानाच्या अवैध साखळीचे धक्कादायक पैलू उघड होत आहेत. सुरुवातीला नेवासा येथील डॉक्टर भणगे, दोन एजंट आणि सहा कुटुंबीय अशा नऊ जणांना अटक करण्यात आली होती. त्यानंतर एकामागून एक धागेदोरे समोर येत गेले आणि तपासाचा व्याप अनेक जिल्ह्यांपर्यंत पोहोचला.

तपासादरम्यान श्रीरामपूर येथील डॉक्टर कुटे आणि डॉक्टर शेख यांना अटक करण्यात आली. त्यानंतर पुण्यातील दोन डॉक्टर आणि वैद्यकीय साहित्य पुरवठादारालाही पोलिसांनी ताब्यात घेतले. पुढे वडगाव मावळ येथील मारुती ढोरे याच्याकडून अवैध लिंगनिदानासाठी वापरले जाणारे मशीन जप्त करण्यात आले. या सर्व आरोपींकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे तपासाची व्याप्ती वाढत गेली.

पुण्यातून अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून निफाड येथील डॉक्टर कुणाल वलटे यांनीही बेकायदेशीररीत्या सोनोग्राफी मशीन खरेदी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलिसांनी वलटे यांच्यासह मेडिकल चालक सागर उन्हाळ यांनाही अटक केली.

दरम्यान, वैद्यकीय साहित्याचा घाऊक पुरवठादार नरेंद्र ठाकरे याच्या चौकशीतून आणखी एका संशयिताचे नाव समोर आले होते. त्यानुसार मागील दहा दिवसांपासून पोलिस त्याचा शोध घेत होते. अखेर अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार श्रीगोंदा तालुक्यातील घोगरगाव येथील जालिंदर रामदास बोरुडे याला आरडगाव परिसरातील शेतातील झोपडीतून ताब्यात घेण्यात आले.

अटक होण्याची शक्यता लक्षात आल्याने बोरुडे हा गेल्या दहा-बारा दिवसांपासून फरार होता. नगर तालुक्यातील हातवळण परिसरातील शेतात लपून बसलेल्या बोरुडेला पोलिसांनी शिताफीने जेरबंद केले. त्याच्या ताब्यातील क्रेटा वाहनातून बेकायदेशीररीत्या खरेदी केलेले आणि गर्भलिंग निदानासाठी वापरले जाणारे सोनोग्राफी मशीनही जप्त करण्यात आले.

या प्रकरणात आतापर्यंत १९ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यामध्ये सहा डॉक्टर, तीन मेडिकल चालक आणि वैद्यकीय साहित्याचा एक मोठा पुरवठादार यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, राज्यातील विविध जिल्ह्यांमधून पाच सोनोग्राफी मशिनांसह चार चारचाकी वाहने जप्त करण्यात आली आहेत.

अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक एम. सुदर्शन आणि अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती, सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज आठरे तसेच तपास पथकाने ही कारवाई केली. पोलीस कॉन्स्टेबल महादेव कोहक आणि संदीप राऊत यांनी आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष परिश्रम घेतल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**आतापर्यंत १९ आरोपी अटकेत, सहा डॉक्टरांवर कारवाई, पाच बेकायदेशीर सोनोग्राफी मशिन जप्त, चार चारचाकी वाहने ताब्यात, अनेक जिल्ह्यांपर्यंत पसरलेल्या रॅकेटचा उलगडा**

अवैध गर्भलिंग निदानाविरोधातील राज्यातील ही अलीकडच्या काळातील सर्वांत मोठ्या कारवायांपैकी एक मानली जात असून तपासातून आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# सोयाबीन बियाण्यांसह ट्रकचा अपहार उघड

## ३०.३९ लाखांचा मुद्देमाल एलसीबीच्या जाळ्यात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर येथून सोयाबीन बियाण्यांचा माल घेऊन निघालेला ट्रक अपहार करून परस्पर विक्रीसाठी नेण्याचा प्रयत्न स्थानिक गुन्हे शाखेने हाणून पाडला. राजगुरूनगर (जि. पुणे) येथील मार्केट यार्डातून ट्रकसह महाबीज कंपनीचे सोयाबीन बियाणे असा तब्बल ३० लाख ३९ हजार ६४८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



या प्रकरणी राहुरी येथील प्रदीप शिवनारायण भट्टड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६(४) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादींचे बंधू सुनील भट्टड यांच्या मालकीचा आयशर ट्रक (एमएच १२ व्हीएफ ६९११) चालक जयसिंग मुक्ताजी भगत याच्याकडे विश्वासाने सोपविण्यात आला होता. मात्र ट्रकवरील महाबीज कंपनीचे सोयाबीन बियाणे नियोजित ठिकाणी न नेता आरोपीने अपहाराच्या उद्देशाने अन्यत्र वळविल्याचे तपासात समोर आले.

गुन्ह्याचा तपास सुरू असताना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने आरोपी व मुद्देमालाचा शोध सुरू केला. गुप्त माहितीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार संबंधित ट्रक राजगुरूनगर येथील मार्केट यार्डात उभा असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत ट्रक ताब्यात घेतला.

कारवाईदरम्यान १५ लाख रुपये किमतीचा आयशर ट्रक आणि १५ लाख ३९ हजार ६४८ रुपये किमतीचे महाबीज कंपनीचे सोयाबीन बियाणे असा एकूण ३० लाख ३९ हजार ६४८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जप्त केलेला मुद्देमाल पुढील तपासासाठी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आला असून, प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप मुरकुटे तसेच रिचर्ड गायकवाड, भगवान थोरात, रमीजराजा आतार आणि विशाल तनपुरे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

विश्वासाने दिलेला ट्रक, थेट मार्केट यार्डात! श्रीरामपूरहून निघालेला ट्रक नियोजित ठिकाणी न पोहोचता थेट राजगुरूनगर मार्केट यार्डात आढळून आल्याने अपहाराचा डाव उघड झाला. स्थानिक गुन्हे शाखेच्या तत्पर कारवाईमुळे लाखो रुपयांचा माल वाचविण्यात पोलिसांना यश आले.

# 'स्वस्त सोन्या'च्या आमिषाचा दरोडा

## जिल्हा परिषद सदस्यासह तिघांकडून ५० लाखांची रोकड, १६ तोळे सोने लंपास

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : स्वस्त दरात सोने मिळवून देण्याचे आमिष दाखवत रायगड जिल्ह्यातील एका जिल्हा परिषद सदस्यासह तिघांना जाळ्यात ओढून तब्बल ५० लाख रुपयांची रोकड आणि १६ तोळे सोन्याचे दागिने लुटल्याची धक्कादायक घटना अहिल्यानगर तालुक्यात घडली. या प्रकरणी १५ जणांविरोधात दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपींच्या शोधासाठी विशेष पथके रवाना केली आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद सदस्य अविनाश नलवाडे, प्रकाश जंगम आणि सोनालाल माळी यांना काही व्यक्तींनी बाजारभावापेक्षा कमी दरात सोने उपलब्ध करून देण्याचे आमिष दाखवले होते. त्यानुसार व्यवहारासाठी संबंधितांनी मोठी रोकड आणि सोन्याचे दागिने सोबत घेतले होते. मात्र, हा व्यवहार प्रत्यक्षात दरोड्याचा सापळा ठरल्याचे समोर आले आहे.

बुधवारी (दि. ४) रात्री उशिरा अहिल्यानगर तालुक्यातील अरणगाव बायपास चौक परिसरात आरोपींनी तिघांना बोलावून घेतल्याचे सांगितले जाते. त्यानंतर नियोजनबद्ध पद्धतीने त्यांच्याकडील ५० लाख रुपयांची रोकड आणि १६ तोळे सोन्याचे दागिने बळजबरीने हिसकावून घेतल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. घटनेनंतर पीडितांनी तत्काळ अहिल्यानगर तालुका पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. विशेष म्हणजे या कटात अविनाश नलवाडे यांच्या कामगाराचाही सहभाग असल्याचा गंभीर आरोप फिर्यादीत करण्यात आल्याने तपासाला नवे वळण मिळाले आहे. पीडितांच्या हालचालींची माहिती आरोपींपर्यंत कशी पोहोचली, याचाही तपास पोलिसांकडून केला जात आहे.

या प्रकरणात राजू मोहिते, अक्षय मोहिते यांच्यासह एकूण १५ जणांविरोधात दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा नोंद होताच पोलिसांनी विविध ठिकाणी शोधमोहीम सुरू केली असून काही संशयितांवर देखरेख ठेवण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# नगरचा नवा राजकीय विक्रम; सभापतींसह १९ आमदारांमुळे राज्यात अव्वल

**जनता आवाज वृत्तसेवा**




**अहिल्यानगर** : विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्यासह विधानसभेतील १२ आणि विधान परिषदेतील ७ असे एकूण १९ आमदारांचे प्रतिनिधित्व असलेला अहिल्यानगर जिल्हा राज्यातील सर्वाधिक आमदारांचा जिल्हा ठरला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून प्राजक्त तनपुरे यांच्या बिनविरोध निवडीमुळे जिल्ह्याची राजकीय ताकद आणखी वाढली असून, विधान परिषदेवर प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांची संख्या सातवर पोहोचली आहे. विशेष म्हणजे, पाच तालुक्यांत प्रत्येकी दोन-दोन आमदार तर कर्जत-जामखेड तालुक्यात तब्बल तीन आमदार असल्याने राज्याच्या राजकारणात अहिल्यानगरचे वजन अधिक वाढल्याची चर्चा सुरू झाली आहे.

जिल्ह्याच्या राजकीय इतिहासात ही संख्या विशेष मानली जात आहे. एकीकडे विधानसभेत विविध पक्षांचे १२ आमदार जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत असताना, विधान परिषदेतही सात सदस्य कार्यरत आहेत. त्यामुळे राज्याच्या विधिमंडळात अहिल्यानगरचा आवाज पूर्वीपेक्षा अधिक प्रभावी झाला आहे.

प्राजक्त तनपुरे यांच्या निवडीपूर्वी विधान परिषदेत सभापती प्रा. राम शिंदे, अमित गोरखे, सुनील कर्जतकर, विवेक कोल्हे, शिवाजीराव गर्जे आणि सत्यजित तांबे हे सहा सदस्य जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत होते. तनपुरे यांच्या समावेशानंतर हा आकडा सातवर गेला आहे.

**तालुकानिहायही राजकीय बळकटी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील काही तालुक्यांनी राजकीय प्रतिनिधित्वाच्या बाबतीत विशेष स्थान निर्माण केले आहे. पाथर्डी, कोपरगाव, संगमनेर, श्रीगोंदा आणि राहुरी या तालुक्यांमध्ये प्रत्येकी दोन-दोन आमदार आहेत. मात्र कर्जत-जामखेड तालुक्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. या तालुक्यातून प्रा. राम शिंदे, रोहित पवार आणि सुनील कर्जतकर असे तब्बल तीन आमदार राज्य विधिमंडळात प्रतिनिधित्व करत आहेत. राज्यातील फार कमी तालुक्यांना अशी संधी मिळालेली आहे.

**भाजपचे वर्चस्व कायम**

जिल्ह्यातील १९ आमदारांच्या संख्येत भाजपचे वर्चस्व स्पष्टपणे दिसून येते. एकूण ९ आमदार भाजपशी संबंधित आहेत. त्याखालोखाल अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ५ आमदार आहेत. शिवसेना (शिंदे गट)चे २, तर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि अपक्ष असे प्रत्येकी १ प्रतिनिधी आहेत. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका आणि जिल्ह्यातील सत्तासमीकरणांमध्ये भाजपची भूमिका अधिक प्रभावी राहण्याची चिन्हे आहेत.

**तनपुरेंचे पुनरागमन चर्चेत**

या संपूर्ण घडामोडीत सर्वाधिक चर्चा प्राजक्त तनपुरे यांच्या पुनरागमनाची होत आहे. २०१९ मध्ये राहुरी विधानसभा मतदारसंघातून विजयी होत त्यांनी महाविकास आघाडी सरकारमध्ये ऊर्जा राज्यमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली होती. मात्र २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला आणि ते सक्रिय सत्ताकेंद्रांपासून दूर गेले.

त्यानंतर बदललेल्या राजकीय परिस्थितीत त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून भाजपची उमेदवारी मिळाल्यानंतर बिनविरोध निवड होत त्यांनी विधान परिषदेवर पुनरागमन केले. जवळपास दीड वर्षांच्या राजकीय प्रतीक्षेनंतर मिळालेली ही आमदारकी तनपुरेंसाठी नव्या राजकीय पर्वाची सुरुवात मानली जात आहे.

**राज्याच्या राजकारणात 'अहिल्यानगर मॉडेल'ची चर्चा**

विधानसभा आणि विधान परिषद मिळून १९ आमदारांचे प्रतिनिधित्व, विविध पक्षांतील प्रभावी नेते आणि अनेक तालुक्यांत दुहेरी-तिहेरी प्रतिनिधित्व या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्हा राज्याच्या राजकीय नकाशावर अधिक ठळकपणे पुढे आला आहे. आगामी काळात जिल्ह्यातील हे राजकीय बळ स्थानिक सत्तासंघर्ष, पक्षीय विस्तार आणि राज्यस्तरीय निर्णयप्रक्रियेत किती प्रभाव टाकते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

दैनिक
# जनता आवाज

अहिल्यानगर, रविवार, दि. ०७ जून २०२६ पान नं. ८

# मोफत गणवेशाला ६० रुपयांची 'कात्री'

## शिक्षकांसमोर आव्हान; प्रतिविद्यार्थी फक्त २४० रुपये

**जनता आवाज वृत्तसेवा**

**देवळाली प्रवरा** : राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी मोफत गणवेश देण्याच्या शासनाच्या सूचनेमुळे मुख्याध्यापक, शिक्षक आणि शाळा व्यवस्थापन समित्यांसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे. वाढती महागाई, गणवेशासाठी अपुरा निधी, शिलाईचा वाढलेला खर्च आणि अत्यल्प कालावधी यामुळे दर्जेदार गणवेश खरेदी करणे कठीण झाल्याची भावना शिक्षक संघटनांकडून व्यक्त होत आहे.

यंदा विद्यार्थ्यांच्या गणवेशासाठी प्रतिविद्यार्थी ३०० रुपयांऐवजी पहिल्या टप्प्यात केवळ २४० रुपये (८० टक्के) निधी देण्यात आला आहे. उर्वरित ६० रुपये नंतर मिळणार असल्याने पुरवठादारही संपूर्ण जबाबदारी स्वीकारण्यास तयार नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे ''मोफत गणवेशाला ६० रुपयांची कात्री'' लागल्याची चर्चा शिक्षण क्षेत्रात रंगली आहे.

जिल्ह्यातील १ लाख ९७ हजार १३६ विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देण्यासाठी ४ कोटी ७३ लाख १२ हजार ६४० रुपयांचा निधी २८ मे रोजी जिल्हा परिषदेकडे प्राप्त झाला. त्यानंतर हा निधी शाळांना वितरित करण्यात आला. मात्र शाळा सुरू होण्यास अवघे काही दिवस शिल्लक असताना शाळा व्यवस्थापन समित्यांच्या बैठका घेणे, पुरवठादारांची निवड करणे, कापड खरेदी करणे, महिला बचत गटांकडून शिलाई करून घेणे आणि नवीन 'समग्र शिक्षा' लोगोची अंमलबजावणी करणे, ही प्रक्रिया अल्पावधीत पूर्ण करणे अवघड असल्याचे मुख्याध्यापकांचे म्हणणे आहे.



सध्या शिक्षकांवर जनगणना, बीएलओसह विविध अशैक्षणिक कामांचा ताण आहे. त्यामुळे गणवेश वाटपाचा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा बनला आहे. याशिवाय यंदा बूट आणि सॉक्ससाठी मंजूर असलेले प्रतिविद्यार्थी १७० रुपयेही अद्याप मिळाले नसल्याने विद्यार्थ्यांना ते वेळेत मिळणार का, याबाबतही साशंकता आहे. शिक्षक संघटनांनी शिक्षणाधिकाऱ्यांकडे निवेदन देत शाळेच्या पहिल्याच दिवशी गणवेश वाटपाची सक्ती करू नये, अशी मागणी केली आहे.

### बूट आणि सॉक्सलाही पैसे नाहीत

यंदा गणवेशाला पहिला टप्प्यात ८० टक्के प्रमाणे ३०० मधून २४० रुपये पाठवले आहेत. उवर्रीत २० टक्केचे ६० रुपये नंतर मिळणार आहेत. याशिवाय, यावर्षी बूट आणि सॉक्ससाठी दिले जाणारे प्रतिविद्यार्थी १७० रुपये देखील मिळालेले नाहीत. त्यामुळे यंदा विदयार्थ्यांना बूट आणि सॉक्स मिळणार का, असाही प्रश्न कायम आहे. पहिल्या दिवशी गणवेश वाटप सक्ती नको बहुतांश शिक्षक बीएलओच्या कामात व्यस्त आहेत. शाळा सुरू होण्यास कमी कालावधी शिल्लक असताना, तातडीने पालकसभा आयोजित करणे आणि पुरवठादारांशी संपर्क साधणे शक्य नाही. या दुहेरी संकटामुळे मुख्याध्यापक अस्वस्थ आहेत.

## धवल क्रांतीत पिचडांचे कार्य लक्षणीय

### डॉ. सुनील शिंदे; स्व. मधुकरराव पिचड जयंती साजरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : सत्तेत असताना आणि सत्तेबाहेर असतानाही स्व. मधुकरराव पिचड यांचा लढाऊ बाणा कायम टिकून राहिला. भंडारदरा धरणावरील पाण्याचा हक्क, निळवंडे धरण निर्मितीतील योगदान आणि दूध उत्पादन क्षेत्रातील धवलक्रांती यासंदर्भातील पिचड यांचे कार्य लक्षणीय ठरले, असे प्रतिपादन डॉ. सुनील शिंदे यांनी केले.

अगस्ती महाविद्यालय आणि अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीने आयोजित केलेल्या स्व. मधुकरराव पिचड जयंती व्याख्यान प्रसंगी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजवादी शेतकरी नेते दशरथ सावंत होते. डॉ. शिंदे म्हणाले, ज्येष्ठ गांधीवादी नेते कै. प्रा. ग. प्रधान तसेच समाजवादी नेते आणि वनराई चे भूतपूर्व अध्यक्ष कै. मोहन धारिया तसेच प्रकाश आंबेडकर या धुरंधर व अभ्यासू नेत्यांनीही पिचड यांच्या आदिवासी विकासासंदर्भातील कार्याची आणि तत्कालीन मंत्री पदावरील दखलपात्र कार्याविषयी आवर्जून प्रशंसा केली होती. पिचड यांच्या प्रथम आमदारकीच्या तिकीटासंबंधी मंजुरी देताना तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पिचड यांची अचूक पारख करुन देत खऱ्या अर्थाने अकोले तालुक्यातील विकासाचा शुभारंभ केला होता.

दशरथ सावंत म्हणाले, प्रशासनावर कै. पिचड यांचे विलक्षण नियंत्रण होते. प्रसंगी कायद्याची चौकट सैल ठेवून अकोले तालुक्यातील धरणग्रस्त शेतकऱ्यांना पिचड यांनी न्याय मिळवून देण्यासाठी पुनर्वसनाचे केलेले प्रभावी कार्य हा महाराष्ट्रातील पहिला प्रयोग ठरला. राजूरच्या माजी सरपंच हेमलता पिचड यांनी कै. मधुकरराव पिचड यांच्या कार्यकुशलतेचे पैलू स्पष्ट करताना पिचड यांच्या सामाजिक व राजकीय कार्याची माहिती मनोगत व्यक्त करताना दिली.



# देवगड रस्त्यावरील वृक्षांना टँकरद्वारे पाणी!

### पर्यावरण दिनानिमित्त अमरनाथ ग्रुपचा उपक्रम



**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नेवासा येथील सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या मॉर्निंग वॉक अमरनाथ ग्रुपच्या वतीने देवगड रस्त्यावरील शेकडो वृक्षांना टँकरद्वारे पाणी देऊन अनोखा उपक्रम राबविण्यात आला. नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा ग्रुपचे प्रमुख मार्गदर्शक नंदकुमार पाटील यांच्या संकल्पनेतून हा कौतुकास्पद उपक्रम साकारण्यात आला.

अमरनाथ ग्रुपच्या वतीने खडका रस्त्यावरील देवगडकडे जाणाऱ्या मार्गावर दोन वर्षांपूर्वी विविध प्रजातींची सुमारे दीडशे वृक्षांची लागवड करण्यात आली होती. केवळ वृक्षलागवड करून न थांबता, कडक उन्हाळ्यातही टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठा करून या वृक्षांचे संगोपन करण्याचे कार्य ग्रुपकडून सातत्याने केले जात आहे.

या वृक्ष जलाभिषेक उपक्रमात सभापती नंदकुमार पाटील, वृक्ष संवर्धन समितीचे व्यवस्थापक रामनाथ जाधव, रवींद्र जोशी, मेजर अरुण धनक, दिलीप जगदाळे, युनायटेड इन्शुरन्स कंपनीचे विकास अधिकारी किशोर गारुळे, व्यापारी शशिकांत नळकांडे, माजी नगरसेवक अंबादास ईरले, शंभूराजे जंगले, पत्रकार सुधीर चव्हाण, नगरसेवक जालिंदर गवळी, इंजिनिअर शंकर ओहोळ, व्यापारी राजेंद्र महाजन, मूर्तिकार बजरंग ईरले, ज्ञानेश्वर उगले, बँक व्यवस्थापक चंद्रकांत काटे आणि सुरेश शिंदे यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

### सामाजिक कार्यातही अग्रेसर!

पर्यावरण संवर्धनासोबतच अमरनाथ ग्रुपने विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्येही नेहमीच पुढाकार घेतला आहे. स्थानिक गोशाळेसाठी शेड उभारणे, भव्य आरोग्य व रक्तदान शिबिरांचे आयोजन, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप तसेच शहर स्वच्छता अभियान यांसारखे उपक्रम ग्रुपच्या माध्यमातून राबविण्यात आले आहेत. याशिवाय अलीकडेच जळीतग्रस्त आपत्तीत नुकसान झालेल्या स्थानिक व्यावसायिकांना आर्थिक मदत देऊन ग्रुपने मोठा दिलासा दिला होता.

# अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी फसवी

### ११ जून रोजी नेवाशात भव्य शेतकरी मोर्चा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : राज्य सरकारने जाहीर केलेली अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना ही शेतकऱ्यांची दिशाभूल करणारी असून, त्यातील जाचक अटींमुळे हजारो शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार असल्याचा आरोप नेवासा तालुका शेतकरी संघटनेने केला आहे. सरकारने निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनानुसार शेतकऱ्यांचा सातबारा पूर्णपणे कोरा करून विनाअट कर्जमुक्ती द्यावी, या मागणीसाठी संघटनेच्या वतीने तहसीलदार संजय बिराजदार यांना निवेदन देण्यात आले.



शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. अजितदादा काळे यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आलेल्या निवेदनात सरकारच्या नव्या शासन निर्णयावर (जीआर) तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. संघटनेच्या मते, २०१९ मधील कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांच्या मर्यादित मदतीची तरतूद करण्यात आली असून, त्यामुळे अनेक कर्जबाजारी शेतकरी नव्या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार आहेत. तसेच २०१९ पूर्वीचे थकबाकीदार शेतकरीही या योजनेतून वगळले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या कथित फसव्या कर्जमाफीविरोधात येत्या ११ जून २०२६ रोजी नेवासा पंचायत समिती कार्यालयापासून तहसील कार्यालयापर्यंत भव्य शेतकरी मोर्चा काढण्यात येणार असून, तहसील कार्यालयासमोर शासनाच्या या जीआरची प्रतीकात्मक होळी करण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

### निवेदन देतेवेळी यांची उपस्थिती

तहसीलदारांना निवेदन सादर करताना नेवासा तालुका शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष मेजर अशोक काळे, उपाध्यक्ष बाबासाहेब नागोडे, युवक आघाडीचे अध्यक्ष डॉ. रोहित कुलकर्णी, कायदेशीर सल्लागार ॲड. बाळासाहेब कावळे, बेलपिंपळगाव जिल्हा परिषद गटप्रमुख बंडोपंत चौगुले, ज्येष्ठ मार्गदर्शक दत्तू पाटील निकम यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कुकडीचे आवर्तनातून बंधारे भरावेत

**जनता आवाज वृत्तसेवा**



**कर्जत** : कुकडी धरणाचे आवर्तन सुरू असताना कर्जत तालुक्यातील सर्व पाजर तलाव बंधारे या पाण्याने भरून द्यावेत, अशी मागणी माजी सरपंच व सामाजिक कार्यकर्ते युवराज हाके यांनी केली आहे. त्यांनी तसे निवेदन संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहे. यावेळी मोहन सायकर भगवान कानगुडे लालासाहेब धांडे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, मागील काही महिन्यांपासून परिसरात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे विहिरी, बोअरवेल तसेच पिण्याच्या पाण्याचे स्रोत कोरडे पडले आहेत. सध्या कुकडीचे आवर्तन सुरू असल्याने उपलब्ध पाण्याचा वापर करून तालुक्यातील सर्व पाझर तलाव व बंधारे भरून देणे शक्य आहे. त्यामुळे भूजल पातळी वाढण्यास मदत होईल तसेच शेतकरी व नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. कुकडीच्या पाण्यामध्ये देशमुख वाडीतील नाजुक तलाव यामध्ये सोडले तर कानगुडवाडी सोनारवाडी क्रमांक सात आठ मधून पाण्याचा जनावरांचा चाऱ्याचा व शेतीचा प्रश्न तात्पुरता स्वरूपात सुटेल वाघजाई, गवळण, सायकर वस्ती, नांदणी नदी मध्ये कुकडीचे उन्हाळी आवर्तन सोडले तर एम वही आखोणी वाईसेवाडी करमणवाडी तसेच जुना शिंपोरा गावच्या पिण्याचा व जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सुटेल.

युवराज भागुजी होके यांच्यासह ग्रामस्थांनी प्रशासनाला इशारा देताना सांगितले की, ''कुकडीचे पाणी तातडीने सोडून सर्व पाझर तलाव व बंधारे भरून दिले नाहीत, तर अधिकारी, राजकीय नेते आणि शासकीय यंत्रणेच्या प्रतिनिधींना गावात व रस्त्यावर फिरू देणार नाही. यासाठी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारण्यात येईल.''

# प्राचार्य डॉ. आहेर यांना पुरस्कार जाहीर

**जनता आवाज वृत्तसेवा**



**पारनेर** : समाजात ज्ञानाचा दीप प्रज्वलित करून विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणाऱ्या, संस्कारक्षम व जबाबदार नागरिक घडविणारे निघोज येथील श्री मुलिकादेवी महाविद्यालयाचे प्राचार्य डा॔. सहदेव आहेर यांच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने 'बी द चेंज फाउंडेशन तर्फे त्यांना ''राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार'' आज रविवारी शिर्डी येथे सन्मान पूर्वक प्रदान करण्यात येणार असल्याची आयोजकांनी दिली आहे.

समाजात आदर्श विद्यार्थी घडवून भारताचे भविष्य उज्ज्वल करणारे प्राचार्य आहेर यांच्या दृष्टीने त्यांचे प्रेरणादायी आहेत. त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून या भव्य सोहळ्यात राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे महाराष्ट्राचा मानाचा भगवा फेटा प्रदान करण्यात येणार आहे.शिक्षक हा राष्ट्रनिर्मितीचा खरा शिल्पकार आहे, या प्रमाणे विशेष बक्षिसासाठी पात्र ठरलेल्या शिक्षकांची निवड ही तज्ञ समितीमार्फत पूर्णतः पारदर्शक व गुणवत्ताधारित पद्धतीने करण्यात आलेली आहे. सर्वांच्या उत्सुकतेचा विषय असलेल्या महाराष्ट्रातील ६ विभागांमधून उत्कृष्ट कार्याच्या आधारे विशेष निवड झालेल्या शिक्षकांचा गौरव या सोहळ्यादरम्यान करण्यात येणार असून त्यांना विशेष भेट वस्तू बक्षीस रूपी प्रदान करण्यात येणार आहे.

# टाकळीभान येथे फसव्या कर्जमाफीची होळी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**टाकळीभान** : राज्य सरकारने नुकतीच कर्जमाफीची घोषणा केल्यानंतर शेतकऱ्यांच्या त्यावर निषेधाच्या प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. काल टाकळीभान येथे रोडवर येऊन टाकळीभान येथील शेतकऱ्यांनी राज्य सरकारने फसव्या कर्जमाफीच्या जीआरची होळी करून निषेध व्यक्त केला.

नुकत्याच जाहीर झालेल्या कर्जमाफीवर शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला असून झालेल्या कर्जमाफीचा लाभ कोणत्याच मूळ खऱ्या, गरजू कर्जदारांना होत नसून निव्वळ फसवी कर्जमाफी असल्याच्या प्रतिक्रिया शेतकऱ्यांमधून उमटत आहेत. या जीआर मध्ये २०१७ व २०१९ पूर्वी थकीत कर्ज झालेल्या शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आलेला नसून, २०१९ कर्जमाफीतील लाभार्थी शेतकऱ्यांना फक्त ५० हजार रुपया पर्यंतची कर्जमाफी देऊन त्यांच्यावरील कर्जाचा बोजा तसाच ठेवण्यात येत असून दोन्ही कर्जमाफीतील शेतकरी मूळ कर्जबाजारी शेतकरी आहेत. नेमकी मग ही कर्जमाफी कोणाला असा प्रश्न कर्जबाजारी शेतकऱ्यांना पडला आहे.



याप्रसंगी टाकळीभान लोकसेवा विकास आघाडीचे अध्यक्ष शिवाजीराव शिंदे, ज्येष्ठ शेतकरी दादासाहेब कापसे, ज्येष्ठ शेतकरी ॲड धनराज कोकणे, सोसायटीचे माजी चेअरमन एकनाथ पटारे, ग्रामपंचायत सदस्य सुनील बोडखे, मच्छिंद्र कोकणे, संजय पटारे,योगेश बिरदवडे, रामेश्वर शिंदे, दादासाहेब गोंडे आदी सह शेतकरी बांधव उपस्थित होते.

२०१७ व २०१९ या कर्जमाफीतील जाचक नियम, अटी व तांत्रिक अडचणीमुळे कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांसाठी विनाअट या कर्जमाफीमध्ये त्यांचा समावेश करणे गरजेचे होते. शेतकरी वर्गाकडून या कर्जमाफीचा निषेध व्यक्त करण्यात येत आहे.

# आ. काळे यांचा उद्या जनता दरबार

**जनता आवाज वृत्तसेवा**



**कोळपेवाडी** : कोपरगाव मतदार संघातील नागरीकांना शासकीय कार्यालयात येणाऱ्या अडचणी जनता दरबाराच्या माध्यमातून आ.आशुतोष काळे यांनी सोडविल्या आहेत. हि जनता दरबाराची परंपरा अविरतपणे सुरु ठेवून पंचायत समितीच्या सर्व विभागात नागरीकांना येणाऱ्या अडचणी व समस्या सोडविण्यासाठी सोमवार (दि.०८) रोजी दुपारी ३ वा. कोपरगाव तहसील कार्यालयात आमदार आशुतोष काळे जनता दरबार घेणार आहेत, अशी माहिती आ. आशुतोष काळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

मतदार संघातील बहुसंख्य नागरिकांचे अनेक शासकीय कार्यालयात विविध प्रकारची कामे असतात. त्या कामांचा पाठपुरावा करण्यासाठी सर्वसामान्य नागरिक, अपंग व्यक्ती, विधवा महिला, जेष्ठ नागरिक, माजी सैनिक, शेतकरी अशा सर्वच स्तरातील सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय कार्यालयात कामानिमित्ताने ये-जा असते. सर्व शासकीय कार्यालयात मतदार संघातील नागरिकांची असलेली कामे विना अडथळा लवकरात लवकर व्हावीत.यासाठी नागरीकांना येणाऱ्या अडी-अडचणी समजून घेवून या अडीअडचणी विविध शासकीय कार्यालयांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसमवेत एकाचवेळी चर्चा घडवून ते प्रश्न तातडीने सुटावे यासाठी आ.आशुतोष काळे जनता दरबार घेत आहेत.


# एसटी कार्डसाठी अतिरीक्त पैशांची मागणी

## चौकशी करून कारवाईची करण्याची गरज

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : शेवगाव तालुक्यात ज्येष्ठ नागरिक कार्ड तसेच एमसीआरटी व एसटी प्रवास सवलत कार्ड काढून देण्याच्या नावाखाली काही खाजगी केंद्रे, काउंटर चालक व एजंटांकडून नागरिकांकडून जादा पैसे उकळले जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. शासनाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक रक्कम आकारली जात असल्याच्या तक्रारी वाढत असून, सर्वसामान्य नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

तालुक्यातील शहरासह ग्रामीण भागात विविध ठिकाणी कार्ड काढून देण्यासाठी नागरिकांची गर्दी होत असते. या परिस्थितीचा गैरफायदा घेत काही ठिकाणी नागरिकांकडून अवाजवी शुल्क आकारले जात असल्याचा आरोप होत आहे. विशेषतः ज्येष्ठ




नागरिक, ग्रामीण भागातील नागरिक, अशिक्षित व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांची आर्थिक पिळवणूक केली जात असल्याची चर्चा सुरू आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शासनाने निश्चित केलेले शुल्क असतानाही काही केंद्रांवर दुप्पट किंवा तिप्पट रक्कम घेतली जात आहे. ''ऑनलाइन प्रक्रिया शुल्क'', ''फॉर्म भरण्याचा अतिरिक्त खर्च'', ''काम तातडीने करून देतो'' किंवा ''विशेष सेवा शुल्क'' अशा विविध कारणांखाली अतिरिक्त पैसे मागितले जात असल्याचे आरोप करण्यात येत आहेत. अनेक नागरिकांना शासनाने निश्चित केलेल्या शुल्काची माहिती नसल्याने त्यांच्याकडून सहजपणे जादा रक्कम वसूल केली जात असल्याचे सांगितले जात आहे.

याबाबत नागरिकांनी सावधगिरी बाळगण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. अधिकृत शुल्काची माहिती घेऊनच अर्ज प्रक्रिया करावी तसेच कोणत्याही व्यक्तीला किंवा एजंटला विनाकारण जादा पैसे देऊ नयेत, असे आवाहन करण्यात येत आहे. या प्रकारामुळे ज्येष्ठ नागरिकांना आर्थिक तसेच मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. शासनाच्या विविध सवलती व योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे मिळवताना नागरिकांची गैरसोय होत असल्याने संबंधित प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. कुठल्याही प्रकारचा आदेश नसताना कॅम्प घेणे अलाऊड नाही

### 'त्या' केंद्र चालकांवर करावी

नागरिकांनी तहसील प्रशासन, संबंधित विभाग व जिल्हा प्रशासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून जादा पैसे उकळणाऱ्या केंद्र चालकांवर व संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. तसेच शासनाने अधिकृत शुल्काचे दरपत्रक सर्व केंद्रांवर आणि सार्वजनिक ठिकाणी अनिवार्यपणे प्रदर्शित करण्याचे निर्दे श द्यावेत, जेणेकरून नागरिकांची फसवणूक होणार नाही, अशीही मागणी होत आहे.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, ✲ कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ RNI No. MAHMAR/2022/85155. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028, RNI No. MAHMAR/2022/85155.